संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी,
वाचतांना येईल वाचनाची गोडी
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २५४ * * अमरावती * सोमवार, दिनांक १० मार्च २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

M.: 7620828933, 8668649460
New NAF
ALISHAN FURNITURE
ALL FURNITURE MANUFACTURER & WHOLESALE & RETAIL
Besa Chowk, Opposite Vyanketesh City, Ghogli Road, Nagpur

अग्राग्रलेख
खरीखरी..

## राजकारणातील आदर्शवाद

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली आहे की, माज्या परिवारातील मीच शेवटचा राजकारणी असणार आहे. आता प्रश्न असा आहे की, राजकारणी माणसाला सत्तेचा मोह तोपर्यंत असतो. जोपर्यंत राजकारणातला किंवा राजकारण्याला जनता जुगारून देत नाही किंवा पक्ष तिकीट देत नाही. तेव्हाच तो राजकारणातून बाहेर पडतो. असे अनेक मोठमोठे राजकारणी आहेत की, आपल्या तीन-तीन, चार- चार पिढ्या सत्तेची पदे भोगत आहेत. म्हणजेच असे आहे की या लोकांनी सत्ता उपभोगावी आणि सामान्य जनतेने त्यांच्या सतरंज्या? उचलाव्या आणि खुर्च्या टाकाव्यात. आता अशा परिस्थितीमध्ये सध्या आपल्या जीवनाच्या प्रत्येक व्यवहारात राजकारणाचा प्रभाव जाणवतो. त्यामुळेच की काय ज्या पक्षाकडे सत्ता असेल. त्या पक्षाकडे विरोधी पक्षातीलही बरेच लोक आकर्षित होतात. पूर्वीच्या कार्यकाळात अशा प्रकारची पक्षांतरे फार कमी होत असत. ज्या पक्षात आपण आहोत त्या पक्षाची विचारसरणी जी काही असेल. त्याविरुद्ध ध्येयधोरणे असलेले नेता मग भले तो अपक्ष असला. तरी जर तो निवडून आला. तर त्याच सत्ताधारी पक्षाकडे जात असतो. तेव्हा निश्चितच ही सगळी बाब अत्यंत चिंताजनक वाटते. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या परिवारातील शेवटचे राजकारणी आपणच आहोत. हे जाहीरपणे सांगणे. निश्चितच आदर्श ठरावी अशी घटना आहे. हा आदर्शवाद दुर्मिळ आहे. याबद्दल त्यांचे म्हणजेच फडणवीसांचे अभिनंदन करायलाच पाहिजे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# चॅम्पीयन्स ट्रॉफी भारताच्या आवाक्यात

■ वृत्तसंस्था, दुबई, दि. ९ :
चॅम्पीयन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारत मजबुत स्थितीमध्ये असून, चॅम्पीयन्स ट्रॉफी भारताच्या कवेत असल्याचे दिसते. अखेरचे वृत्त हाती आले तेंव्हा भारताला २४ चेंडूत केवळ २१ धावा करायच्या होत्या. यावेळी भारताने ५ गडी गमावले होते

चॅम्पीयन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात न्युझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला .नाणेफेक गमावल्यानंतर क्षेत्ररक्षण करणाऱ्या भारतीय कर्णधार रोहित शर्माने नवीन चेंडू मोहम्मद शमीकडे सोपवला. न्यूझीलंडचा सलामीवीर विल यंगने शमीच्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर चौकार मारून संघाचे खाते उघडले.

रचिन रवींद्रने डावाच्या चौथ्या षटकात आणि हार्दिक पंड्याच्या दुसऱ्या षटकात ३ चौकार मारले. यामध्ये २ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. हार्दिकच्या या षटकातून १६ धावा आल्या. ७ व्या षटकात विल यंगला जीवदान मिळाले. षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर मोहम्मद शमीने विल यंगचा झेल सोडला. न्युझीलंड संघाची सुरूवात धडाकेबाज झाली. त्यांनी पॉवरप्लेमध्ये ६४ धावा केल्या. एवढेच नाही तर पहिल्या १० षटकांत संघाने एकही विकेट गमावली नाही.

तथापि, कुलदीप यादव आणि वरूण चक्रवर्ती या दोन स्पीनर गोलंदाजानी न्युझीलंड संघाला मोठे धक्के दिले. परिणामी, किवीचा संघ गडगडला वरुण चक्रवर्तीच्या षटकात रचिन रवींद्रला दोन जीवदान मिळाले. आठव्या षटकात श्रेयस अय्यरने त्याचा झेल मिडविकेटवर सोडला. ७ व्या षटकात विल यंगला जीवदान मिळाले.

रचिन रवींद्रने डावाच्या चौथ्या षटकात आणि हार्दिक पंड्याच्या दुसऱ्या षटकात 3 चौकार मारले. यामध्ये २ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. हार्दिकच्या या षटकातून १६ धावा आल्या. नंतरच्या काळात किवीच्या विकेट पडत राहिल्या आणि त्यांचा डाव २५१ धावांवर संपला .

प्रत्युत्तरादाखल फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताची सुरूवात स्फोटक झाली. कर्णधार रोहित शर्मा याने धुंवाधार फलंदाजी केली .

पहिले षटक टाकणाऱ्या काइल जेमिसनच्या दुसऱ्या चेंडूवर रोहित शर्माने षटकार मारून संघाचे खाते उघडले. या षटकातून ९ धावा आल्या. ८ व्या षटकात रोहित शर्माने नॅथन स्मिथच्या चेंडूवर ३ चौकार मारले. रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी १७ व्या षटकात त्यांची शतकी भागीदारी पूर्ण केली. सँटनरच्या शेवटच्या चेंडूवर गिलने एक धाव घेतली आणि सलामीची भागीदारी १०० धावांपर्यंत पोहोचवली.

१९ व्या षटकात शुभमन गिल ३१ धावा करून बाद झाला. २० व्या षटकात विराट कोहली एक धाव काढून बाद झाला. २७ व्या षटकात कर्णधार रोहित शर्मा ८३ चेंडूत ७६ धावा करून बाद झाला. त्याला टॉम



रोहितने षटकार मारून टीम इंडियाचे खाते उघडले.
भारतीय डावातील पहिले षटक टाकणाऱ्या काइल जेमिसनच्या दुसऱ्या चेंडूवर रोहित शर्माने षटकार मारून संघाचे खाते उघडले. या षटकातून ९ धावा आल्या.
रोहित शर्माने सहाव्या षटकात नॅथन स्मिथला ९२ मीटर लांबीचा षटकार मारला. त्याने सरळ पुढे लेंथ बॉल टाकला आणि प्रेक्षकांपर्यंत पोहोचला.

## उपराष्ट्रपती धनखड एम्समध्ये दाखल

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९ :
उपराष्ट्रपती जगदीप धनखड (७३ वर्षे) यांना दिल्ली एम्समध्ये दाखल करण्यात आले आहे. रात्री उशिरा त्यांना अस्वस्थता आणि छातीत दुखण्याची तक्रार होती. त्यानंतर, रविवारी पहाटे २ वाजता त्यांना एम्समध्ये दाखल करण्यात आले. पीटीआयच्या वृत्तानुसार, ते सध्या कार्डिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. राजीव नारंग यांच्या देखरेखीखाली क्रिटिकल केअर युनिट (सीसीयू) मध्ये आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. आरोग्यमंत्री जेपी नड्डा स्वतः एम्समध्ये त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी गेले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी एम्स रुग्णालयात भेट दिली आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड (७३) यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यांनी वर लिहिले - एम्समध्ये गेलो आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड जी यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. मी त्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी आणि लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो. केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनीही आज सकाळी एम्सला भेट दिली. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.



## पाण्याच्या टाकीत उतरलेल्या ४ कामगारांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
मुंबईतील नागपाडा परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पाण्याची टाकी साफ करत असताना गुदमरून चार सफाई कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. तर एक कामगार गंभीर जखमी झाला असल्याचे समजते. एका बांधकामाधीन इमारतीत ही घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस, बीएमसीचे कर्मचारी आणि रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचले आहेत.

या कामगारांना तत्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून गुदमरलेल्या चार कामगारांना मृत घोषित केले आहे. एक कामगार गंभीर अवस्थेत असल्याची माहिती मिळाली आहे. या अचानक झालेल्या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मुंबईच्या नागपाडा परिसरात असलेल्या बिस्मिल्ला स्पेस या निमार्णाधीन इमारतीच्या तळघरातील एका पाण्याच्या टाकीत हे पाच कामगार उतरले होते. पाण्याच्या टाकीत लावण्यात आलेले खांब काढण्यासाठी आणि

**एकाची प्रकृती गंभीर मुंबईतील नागपाडा येथील घटना**



ती टाकी साफ करण्यासाठी हे कामगार उतरले. मात्र, बराच वेळ झाला तरी हे कामगार बाहेर आलेच नाहीत. त्यामुळे इतर कामगारांनी अग्निशमन दल आणि पोलिसांना याची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी या पाच कामगारांना टाकीतून बाहेर काढले आणि उपचारासाठी जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले.

रुग्णालयातील डॉक्टरांनी या कामगारांना तपासून ४ जणांना मृत घोषित केले, तर एकाची प्रकृती गंभीर आहे. पाण्याच्या टाकीची साफसफाई करताना गुदमरूनच त्यांचा मृत्यू झाला असावा असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. हसीबुल शेख, राजा शेख, जलालू शेख, इमानदू शेख अशी मृत कामगारांची नावे आहेत. तर पुरहन शेख या कामगाराची प्रकृती गंभीर आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी ११-११.३० च्या सुमारास ही घटना घडली. जेजे मार्ग पोलीस ठाण्यांतर्गत मस्तान तालाबजवळील दिमतीमकर रोडवरील बिस्मिल्ला स्पेस नावाच्या बांधकामाधीन इमारतीमधील भूमिगत पाण्याच्या टाकीत हे सर्व उतरले होते. सुरुवातीला पाच मजुरांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. मात्र, मुंबई पोलिसांनी नंतर या घटनेला दुजोरा देत चार मजुरांचा मृत्यू झाला.

## गडचिरोलीतील नक्षलवाद्यांचे प्रवेशद्वार बंद

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ९ :
नक्षलवाद्यांचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दक्षिण गडचिरोलीतील भामरागड तालुक्यातील कवंडे येथे तब्बल एक हजार जवानांनी अवघ्या २४ तासात पोलीस मदत केंद्र उभारल्याने नक्षलवाद्यांना मोठा धक्का बसला आहे. कवंडे हे गाव छत्तीसगड सीमेपासून केवळ दोनशे मीटर अंतरावर असल्याने नक्षलवादी येथून गडचिरोली जिल्ह्यात प्रवेश करायचे. परंतु हे केंद्र उभारल्यामुळे नक्षलवाद्यांची कोंडी झाली आहे.

देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी २०२६ पर्यंत देश नक्षलवादमुक्त करण्याची घोषणा केल्यानंतर देशभरात नक्षलविरोधी मोहीम तीव्र करण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर छत्तीसगडसह गडचिरोली जिल्ह्यातही नक्षलवादावर अंकुश ठेवण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. मागील तीन वर्षात गडचिरोली पोलिसांनी छत्तीसगड अबुझमाड सीमेवर सात पोलीस मदत केंद्राची स्थापना केली आहे.

यातील भामरागड तालुक्यात येत असलेल्या नेलगुंडा, पेनगुंडा आणि कवंडे ही गावे नक्षलवाद्यांचे नंदवन म्हणून ओळखल्या जायचे.

मात्र, गेल्या तीन महिन्यात या तीनही गावात गडचिरोली पोलिसांनी रस्ते, मोबाईल नेटवर्कसह पोलीस मदत केंद्र उभारून नक्षलवादाचे कंबरडे मोडले आहे. कवंडे येथून जवळ असलेल्या इंद्रावती नदीपासून छत्तीसगड येथील बिजापूर जिल्ह्याची सीमा आहे. हा परिसर नक्षलवादी कारवायांच्या दृष्टीने अतिसंवेदनशील आहे.

त्यामुळे नदीवरील पुलाचे काम काही महिन्यांपासून रखडले आहे. कवंडे येथे पोलीस मदत केंद्राची स्थापना झाल्याने लवकरच हा मार्ग पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे नेलगुंडापासून कवंडेला जाण्यासाठी रस्ताच नव्हता. जवानांनी २४ तासात रस्ता बनवून सर्व साहित्य नेले.

# मुंबईची अवस्था बकाल आणि बिकट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
आगामी महापालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तत्पूर्वी पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधत सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्ला चढवला. एकनाथ शिंदे यांचे सोन्याचे चमचे अजय अशर यांच्या ताब्यात असून ते दुबईल पळालेत, अशी टीका राऊत यांनी केली. तसेच पालिकेच्या ९० हजार कोटींच्या ठेवींवर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदेंपासून पंतप्रधान मोदींचाही डोळा आहे असा हल्लाबोलही त्यांनी केला.

संजय राऊत यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, शिवसेनेची सत्ता असताना महापालिकेची अर्थव्यवस्था सक्षम आणि मजबूत होती. ९० हजार कोटींच्या ठेवी या सुरक्षा म्हणून उद्धव ठाकरे यांनी ठेवल्या होत्या. तीन वर्षांपासून



निवडणूक नाही, प्रशासकीय कारभार आहे. या ९० हजार कोटींच्या ठेवींवर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदेंपासून पंतप्रधान मोदींचाही डोळा आहे. हा जनतेच्या कराचा पैसा आहे.

हा पैसा मुंबईच्याच नव्हे तर राज्याच्या सुरक्षेसाठी ठेवलेला पैसा होता. त्या ठेवी मोडून कारभार करत

**पालिकेच्या ९० हजार कोटींच्या ठेवींवर सत्ताधाऱ्यांचा डोळा संजय राऊतांचा हल्लाबोल**

असाल तर याचा अर्थ तुमचे आर्थिक नियोजन पूर्णपणे कोलडमडलेले आहे आणि मुंबईची अवस्था बकाल आणि बिकट झालेली आहे, अशी टीका संजय राऊत यांनी केली.

जम्मू कश्मीरमधली लोक आंदोलन करतील आणि काश्मीर भारतात येईल असे राजनाथ सिंह म्हणाले. गेली १० वर्ष राजनाथ सिंह असे म्हणत आहेत. राजनाथ सिंह, जय शंकर, अमित शहा किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात की पाकव्याप्त कश्मीर आम्ही हिंदुस्थानात आणू. गेली १० ते ११ वर्ष सांगत आहेत. राजनाथ सिंह यांच्या हातात सैन्य आहे, त्यांना कुणी अडवलेय? असा सवाल संजय राऊत यांनी केला.

## पतीने चिरला पत्नीचा गळा

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ९ :
कौटुंबिक कलहातून पतीनेच पत्नीचा गळा चिरून हत्येचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार महिला दिनी घडला.शहरातील रामकृष्ण नगरात शनिवारी ८ जानेवारी रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास हा थरार घडला. कुंदा भूपेंद्र पाहुणे (२५) असे जखमी पत्नीचे नाव आहे. आरोपी पती भूपेंद्र (मुन्ना) गणेश पाहुणे (२५, रामकृष्ण नगर, संताजी सभागृह) यास तुमसर पोलिसांनी अटक केली आहे.

गंभीर जखमी झालेल्या पत्नीला उपचारार्थ उपजिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेच्या दिवशी आरोपी भूपेंद्र याचा पत्नीशी शाब्दिक वाद घडला. वाद विकोपा गेला आणि रागाच्या भरात भूपेंद्रने स्वयंपाक घरातील सुरीने चक्क पत्नीचा गळा चिरला.

त्यात तिने स्वतःला कसेबसे सावरत रक्ताच्या थारोळ्यात बाहेर निघून शेजाऱ्यांनी मदतीसाठी हाक मारली. त्यातून सदर घटना उघडकीस आली. तुमसर पोलिसांना सूचना करून स्थानिकांनी लगेच जखमीला उपचारार्थ हलविले. वैद्यकीय माहितीनुसार महिलेची प्रकृती धोक्याबाहेर असून रक्तस्राव झाल्याने तिच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती आहे.

एकीकडे सुरक्षा तथा सशक्तीकरणातून महिला सन्मानाची जाणीव समाजात रुजवली जात आहे. त्यात चक्क महिला दिनीच पतीने राग अनावर होत पत्नीवर प्राणघातक हल्ला केल्याची घटना महिला दिनाला गालबोट लावणारी ठरली आहे.

## सतीश भोसलेला गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईची धमकी

■ महासागर प्रतिनिधी, बीड, दि. ९ :
सतीश भोसले उर्फ 'खोक्या'ला गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईच्या नावाचा वापर करून धमकी दिल्याची माहिती समोर आली आहे. एका फेसबुक अकाउंटवरून ही धमकी देण्यात आली असून ही फेसबुक पोस्ट चांगलीच व्हायरल होत आहे. 'खोक्या'ला लवकरात लवकर अटक करा, अशी मागणी करत अटक न केल्यास मी त्याला शिक्षा देईन, अशी धमकी या फेसबुक पोस्ट करण्यात आली आहे. सतीश भोसले याचे नवनवीन कारनामे सध्या समोर येत आहेत. शेकडो वन्य जीव, हरिण, काळवीट, ससे आणि मोरांची शिकार केली असल्याचा गंभीर आरोप वन्यजीवप्रेमींनी केला आहे. पोलिस आणि वन विभागाच्या पथकाने आज त्याच्या घराची झाडाझडती घेतली. या कारवाईत त्याच्या घरात वन प्राण्यांचे मांस आणि शिकारीसाठी वापरले जाणारे हत्यारे सापडले.

# फडणवीसांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून दाखवावे : उद्धव ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
शिवसेना उबाठा नेते उद्धव ठाकरे यांनी रविवारी ईशान्य मुंबईत निर्धार शिबीर घेतले. या शिबिरातून त्यांनी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार टीका केली. ठाकरे म्हणाले की, भाजप ही फेक नरेटीव्ही आहे. उद्या अर्थसंकल्प सादर होणार आहे. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून दाखवावे. त्यासोबतच त्यांनी लाडक्या बहिणींना दिलेले २१०० रुपयांचे आश्वासन पूर्ण करावे आणि त्यानंतरच आमची बराबरी करावी.

तसेच, उद्धव ठाकरे यांनी ते प्रयागराजला का गेले नाहीत, या संदर्भात



स्पष्टच सांगितले. ते म्हणाले की, आम्ही मोहन भागवत यांचे फॉलोवर आहोत. ते जे करतात ते आम्ही करतो. मोहन भागवत गेले नाही तर मी कसा प्रयागराजला जावू. ते स्वतः जात नाही आणि लोकांना सांगतात. रविवारी चॅम्पियन ट्रॉफीचा अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंडमध्ये सुरू आहे. त्याचा संदर्भ घेत त्यांनी विरोधकांची दांडी उडवणार असल्याचे सांगितले. महाराष्ट्रात आपली सत्ता मी आणणार, त्यांना सोडणार नाही. आम्ही जय श्रीराम बोलू, पण भाजपला जय शिवाजी, जय भवानी बोलण्यास भाग पाडू. प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांचे मंदिर उभारणार आहे, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. क्रिकेट सामन्याचा संदर्भ देत उद्धव ठाकरे म्हणाले की, मला स्कोअरची चिंता नाही. विरोधकांची दांडी उडवणार आहे. सामना दुबईत सुरू आहे. टीव्हीवर सामना बघू शकतो. त्यासाठी दुबईत जाण्याची काय गरज? शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार मानणारे सांगणारे लोक दुबईत गेले होते.

## अंधेरीत गॅसवाहिनी फुटल्याने रस्त्यावर भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
अंधेरी येथील तक्षशिला परिसरातील गुरुद्वारान जीकच्या रस्त्यावर शनिवारी रात्री साडेबाराच्या सुमारास गॅसवाहिनी फुटल्याने भीषण आग लागली. या आगीत दोन दुचाकीस्वार आणि एक रिक्षाचालक होरपळल्याने जखमी झाले असून सद्यस्थितीत जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, आगीत दोन वाहने जळून खाक झाली असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.

अंधेरीतील शेर ए पंजाब हॉटेलजवळील रस्त्याखालील एमजीएल आणि पीएनजी वायूचा पुरवठा करणाऱ्या गॅस वाहिन्यांना रात्री उशिरा गळती लागली. गळती लागल्याने तात्काळ आगीने पेट घेतला. गळतीबाबत अनभिज्ञ वाहक त्याच रस्त्यावरून जात होते. आगीने पेट घेताच रत्यावरील धावत्या दोन वाहनांमध्ये आग पसरली. आगीचे लोट परिसरात पसरल्याने स्थानिकांमध्ये खळबळ उडाली. आगीत अरविंद कुमार कैठल (२१), अमन सरोज (२२), सुरेश गुप्ता (५२) हे तिघे जखमी झाले.

## सत्ताधारी मुंबईला अदानीच्या घशात घालतील : आदित्य ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा आज निर्धार मेळावा पार पडत आहे. या मेळाव्यात बोलताना वरळीचे आमदार आदित्य ठाकरे यांनी शिंदे गट आणि भाजपवर जोरदार हल्ला चढवला. मुंबईला गुजरातच्या नाही, तर अदानीच्या घशात घालणे सुरू आहे. मुंबई महाराष्ट्राची ठेवायची असेल, तर आपल्याला लढावे लागेल आणि जिंकावेच लागेल, असे आदित्य ठाकरे म्हणाले. यावेळी आदित्य ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीतील यश आणि विधानसभा निवडणुकीतील पराभवावरही भाष्य केले.

शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना आदित्य ठाकरे म्हणाले, भाजपवाल्यांनी व्होटर फ्रॉड नसता केला, तर आपण विधानसभा निवडणुकीत जिंकलो होतो. हा व्होटर फ्रॉड देखील आपण



लोकांसमोर आणणार आहोत. एक महिन्यांपूर्वी संजय राऊत, राहुल गांधी, सुप्रिया सुळे या तिघांनी हा झालेला व्होटर फ्रॉड दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन सर्वांसमोर आणलेला आहे. जनतेने आपले मत जे महाविकास आघाडीला दिले होते, ते त्यांनी फिरवले कसे हे आपण सांगायला पाहिजे. भाजपवाल्यांनी खोटी मतदार नोंदणी करून जनतेचे मत खाल्ले कसे? हे आपल्याला लोकांसमोर आणावे लागणार आहे.

२०२२ मध्ये या गद्दारांनी आपले सरकार पाडले. या महाराष्ट्राला त्यांनी गद्दारीची, खोकेबाजाची, धोकेबाजीची कीड लावली. आपले सरकार पाडल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता. पण यावेळी जेव्हा त्यांचे सरकार बनत होते, सगळे सत्ताधारी बाकावर बसले होते, ते सुद्धा तेवढेच शॉकमध्ये होते. आताची भाजप ही नवीन भाजप आहे. अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुंबईत प्रकाश मेहता, राजपुरोहित यांची जी भाजप होती, ती जुनी होती. आजची भाजप ही कॉन्ट्रॅक्टर लोकांची आहे, ती मूळ भाजप नाहीच, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली. जुन्या भाजपमधील लोक आम्हाला सांगतात, आदित्यजी आमचे सरकार आले कसे? हे आम्हालाही माहीत नाही, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

# ठाण्यात भीषण अपघातात तीन वाहनांची एकमेकांना धडक, जखमींत बालकांचा सामावेश



■ महासागर प्रतिनिधी,

ठाणे, दि. ९ : कल्याण पूर्वेतील विजयनगर भागात दोन रेडी मिक्सर वाहनांनी नऊ वाहनांना धडक दिल्याची घटना ताजी असतानाच, रविवारी मध्यरात्री ठाण्यातील पूर्व द्रुतगती महामार्गावर तीन वाहनांची एकमेकांना धडक बसली. हा अपघात इतका भीषण होता की, यामध्ये एका कारचा चुराडा झाला आहे. या अपघातात कारमधील सहा जण जखमी झाले असून त्यामध्ये लहान मुलांचा सामावेश आहे. त्यांच्यावर ठाण्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातामुळे मुख्य मार्गावरील वाहतुक सुमारे एक तास बंद होती. येथील वाहतुक सेवा रस्त्याने सोडण्यात आली.

त्यामुळे काही काळ वाहतुक कोंडी झाली होती. राहुल जावळे (३६), स्वाती जावळे, (३५), स्वरा जावळे (१२), शांभवी जावळे, (१), प्रियंका विजय बागुल (३८) आणि शौर्य विजय बागुल (१६) अशी जखमींची नावे आहेत. हे सर्वजण रविवारी मध्यरात्री कारमधून प्रवास करत होते. ते मध्यरात्री १.३०. वाजताच्या सुमारास पूर्व द्रुतगती महामार्गावरील कॅडबरी भागातून वाहतुक करत होते. त्याचवेळी एक माती वाहून नेणारा डम्पर मुलुंड चेकनाका येथून कशेळीच्या दिशेने वाहतुक करत होता.

या डम्पर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे हा डम्पर एका मालवाहू ट्रकला आदळला. ट्रक चालकाचे नियंत्रण सुटून तो ट्रक समोरील जावळे यांच्या कारला आदळला. हा अपघात इतका भीषण होता की, त्यांच्या कारचा अक्षरश: चुराडा झाला. घटनेची माहिती वाहतुक पोलिसांना मिळाल्यानंतर राबोडी पोलीस ठाण्याचे कर्मचारी, वाहतुक पोलीस, ठाणे महापालिकेचे अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना मदत कार्य सुरू केले. दरम्यान, कारमध्ये राहुल आणि स्वाती हे अडकले होते. पथकाने त्या दोघांना कारमधून बाहेर काढले. सर्व जखमींना एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. बचावकार्य सुरु असल्याने कॅडबरी उड्डाणपूलावरून घोडबंदर, भिवंडीच्या दिशेने वाहतुक करणारी वाहिनी एक तास बंद ठेवण्यात आली होती.

येथील वाहनांना सेवा रस्त्याने वाहतुक करावी लागली. त्यामुळे वाहतुक कोंडी झाली होती. शनिवारी देखील कल्याणमध्ये अशाचप्रकारे भीषण अपघात झाला होता. कल्याण येथील विजय नर भागात पुना जोड रस्त्यावर शनिवारी सकाळी पावणे अकरा वाजण्याच्या दरम्यान दोन रेडी मिक्सर वाहनांनी नऊ वाहनांना धडक देऊन चिरडले. सुदैवाने या अपघातात जीवित हानी झाली नाही.

# क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न बहाल करण्याचा ठराव संमत होणार

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ९ : क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न देण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेत ठराव संमत करून केंद्र सरकारकडे शिफारस पाठवली जाणार असल्याची मोठी घोषणा राज्याचे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी केली. विधानसभेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भात अशासकीय ठराव मांडला होता. त्यावर उत्तर देताना रावल यांनी पुढील आठवड्यात हा ठराव संमत केला जाईल, असे जाहीर केले.

## महात्मा फुले दाम्पत्याच्या कार्याचा गौरव

आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या ठरावात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या अतुलनीय कार्याचा उल्लेख केला. अस्पृश्यता निवारण आणि स्त्री शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे संपूर्ण समाजाला शिक्षणाचा लाभ मिळाला. आज विधानसभेत महिला आमदार आहेत, हेही त्यांच्याच संघर्षाचे फलित आहे. फुले दाम्पत्याने समाजप्रबोधनाची नवी दिशा दिली आणि पुरोगामी विचारांची चळवळ उभी केली. त्यामुळे त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून भारतरत्न पुरस्काराने त्यांना गौरवले पाहिजे, असे मुनगंटीवार यांनी ठामपणे सांगितले.

## १० मार्चला ठराव संमत करण्याची शक्यता

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून १० मार्चला हा ठराव मंजूर करण्याची मागणी मुनगंटीवार यांनी केली. त्यांनी या प्रस्तावाचा पाठपुरावा सुरूच ठेवणार असल्याचेही स्पष्ट केले. आतापर्यंत ४८ जणांना भारतरत्न प्रदान करण्यात आला आहे. त्यापैकी १४ जणांना मरणोत्तर हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देण्यात आला आहे. त्यामुळे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना वा भारतरत्न मिळावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली.

**आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला मोठे यश**

**राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांची विधानसभेत घोषणा**

## राज्य सरकारचा ठराव केंद्राकडे पाठवणार

या ठरावावर प्रतिक्रिया देताना राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी फुले दाम्पत्याचे कार्य संपूर्ण देशासाठी नव्हे तर जगासाठी मार्गदर्शक असल्याचे सांगितले. राज्य सरकार त्यांना अभिवादन करण्यासाठी कटिबद्ध आहे आणि लवकरच हा ठराव शासकीय स्वरूपात विधानसभेत मांडण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले.

## आमदार मुनगंटीवार यांचा अभिमानास्पद क्षण

या संदर्भात बोलताना आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत हा ठराव मांडताना अभिमान आणि सौभाग्य वाटत असल्याची भावना व्यक्त केली. शिक्षणाचे अमृत आपल्याला लाभावे, यासाठी फुले दाम्पत्याने केलेले कार्य संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे त्यांना भारतरत्न बहाल करणे ही गौरवाची बाब ठरेल. शासनाने हा ठराव शासकीय स्वरूपात मांडण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी शासनाचे अभिनंदन केले आणि आभार मानले.

यामुळे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेने मोठे पाऊल उचलले असून, लवकरच हा ठराव संमत करून केंद्र सरकारकडे पाठवला जाणार आहे.

# शिवसेना नव्हे, अनाजी पंत सेना उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

## मराठी भाषा, भगवा आणि शिवसेना विचारधारेवर ठाकरेंचे आक्रमक वक्तव्य

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ९ : स्वराज्यासोबत आणि भगव्याशी द्रोह करणे हे अनाजी पंत करू शकतात. त्याच अनाजी पंतांकडून प्रेरणा घेऊन शिवसेना नव्हे, तर एक अनाजी सेना तयार झाली आहे, असा जोरदार हल्लाबोल शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता केला.

तसेच, मराठी भाषेबाबत वादग्रस्त विधान करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते सुरेश उर्फ भैय्याजी जोशी यांनाही ठाकरेंनी सूचक इशारा देत तीव्र टीका केली.

मुंबईतील फोर्ट येथे ४४ वर्षांची परंपरा असलेल्या शिवराय संचलनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्धव ठाकरे बोलत होते. यावेळी त्यांनी शिवसेनेच्या संघर्षमय वाटचालीचा उल्लेख करत, शिवसेना ही एक विचारधारा आहे आणि ती कधीच संपणार नाही, असे ठाम मत व्यक्त केले. अनाजी पंत जन्माला येतात, पण शिवछत्रपती पुन्हा जन्म घेत नाहीत. उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज हे आपले दैवत आहेत. त्यांच्यापासून प्रेरणा घेत १४६६ मध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली. प्रत्येक काळात एक युद्ध असते. छत्रपती शिवाजी महाराज पुन्हा जन्माला येणार नाहीत, पण दुर्दैवाने अनाजी पंत आणि औरंगजेब पुन्हा जन्म घेतात. याही काळात ते आले आहेत, अशा शब्दांत ठाकरे यांनी शिंदे गटावर निशाणा साधला.

तसेच, शिवसेनेच्या ऐतिहासिक परंपरेला गालबोट लावणाऱ्यांना अनाजी सेना असे संबोधत, ती शिवसेना नसून एक वेगळीच संघटना असल्याची टीका त्यांनी केली.

### मराठी भाषा, भगवा आणि महाराष्ट्राची परंपरा टिकून राहील

उद्धव ठाकरे यांनी मराठी भाषेबाबत वादग्रस्त विधान करणाऱ्या भैय्याजी जोशी यांना उद्देशून तीव्र शब्दांत इशारा दिला. मराठी भाषेबद्दल आणखी एका अनाजी पंतांनी गरळ ओकली आहे.

त्यांनी लक्षात ठेवावे, हातात भगवा घेतलेले हे मावळे आजही जिवंत आहेत. अनाजी पंतांच्या कितीही पिढ्या आल्या तरी त्यांना महाराष्ट्राची परंपरा आणि मराठी भाषा संपवता येणार नाही, असे म्हणत त्यांनी मराठी भाषेच्या सन्मानासाठी लढण्याचा निर्धार व्यक्त केला.

### शिवसैनिक अजूनही जिवंत आहेत

ठाकरेंनी आपल्या भाषणाच्या शेवटी शिवसैनिकांना उद्देशून एकजुटीचे आणि लढण्याचे आवाहन केले. शिवसेनेची निष्ठेची परंपरा वर्षांपासून तीन पिढ्या पुढे नेत आहेत. शिवसैनिक आजही जिवंत आहेत आणि ते कुठल्याही अनाजी पंतांना महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाला घालू देणार नाहीत, असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले.

राजकीय रणधुमाळी अधिक तीव्र होण्याची शक्यता. उद्धव ठाकरेंच्या या आक्रमक टीकेमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवा कलाटणीबिंदू निर्माण झाला आहे. याला एकनाथ शिंदे गट आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काय प्रत्युत्तर देतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# ४ ते १५ वयोगटातील मुलींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगावरील लस मोफत

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची विधान परिषदेत माहिती

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि.९ : राज्यातील ४ते १५ वयोगटातील मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी मोफत लस देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. सुमारे २,२००, रुपये किमतीची ही लस राज्य आणि केंद्र सरकारच्या समन्वयाने उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधान परिषदेत दिली.

### कर्करोग जनजागृतीसाठी विशेष मोहिम

यावेळी राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पॉपुलेशन बेस्ड कॅन्सर आणि जनजागृती मोहिम राबवली जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले. राज्यात महिला आरोग्य तपासणी आणि कर्करोग प्रतिबंधक उपाययोजना अधिक प्रभावी करण्यासाठी ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

विधान परिषदेत आमदार चित्रा वाघ यांनी हा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी राज्यातील स्त्रियांमध्ये कर्करोगाचे वाढते प्रमाण आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी केली.

त्यावेळी त्यांनी सांगितले की, दरवर्षी भारतात सुमारे १.६. लाख महिलांना कर्करोगाचे निदान होते, त्यातील ८० हजार महिलांचा मृत्यू होतो. शहरी भागात ग्रामीण भागाच्या तुलनेत कर्करोगाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे समुपदेशन आणि जनजागृती वाढवण्याची नितांत गरज आहे.

### महिला आरोग्यासाठी मोफत तपासणी आणि औषधोपचाराची मागणी

चित्रा वाघ यांनी शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी असलेल्या महिला स्वच्छतागृहांचे ऑडिट करण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच, गरीब आणि मध्यमवर्गीय महिलांसाठी कर्करोगावरील औषधे व मॅमोग्राफी तपासणी मोफत करावी, अशीही मागणी त्यांनी केली.

या मुद्द्याला विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार उमा खापरे, मनीषा कायंदे आणि प्रज्ञा सातव यांनीही पाठिंबा दर्शवला. २कोटी महिलांची आरोग्य तपासणी पूर्ण

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी राज्यातील महिलांच्या आरोग्यविषयक तपासणीविषयीची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राज्यात आतापर्यंत २ कोटी महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. त्यात ४३,६३५, महिलांना स्तनाचा कर्करोग असल्याचे निदान झाले, तर ८४२ महिलांना अन्य प्रकारचा कर्करोग असल्याचे आढळले.

गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावरील मोफत लसीकरणाचा निर्णय

महिलांमध्ये वाढत्या कर्करोगाच्या घटनांमुळे सरकार गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावरील लसीकरण मोफत देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

४ ते १५ वयोगटातील मुलींना ही लस मोफत देण्यात येईल. यासाठी राज्य आणि केंद्र सरकार आर्थिक नियोजन करून अंतिम निर्णय घेतील, असे मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले.

कर्करोग रोखण्यासाठी सरकारचे पुढील पाऊल

महिलांमध्ये कर्करोगाचे वाढते प्रमाण चिंताजनक असून त्यावर वेळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत.

**देशाच्या आणि राज्याच्या समृद्ध वारशात महिलांचे मोठे योगदान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

# महिला दिनाच्या निमित्ताने विधान परिषदेत महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ९ : स्त्री म्हणजे वात्सल्य, मांगल्य, मातृत्व आणि कर्तृत्व यांचा सुंदर संगम आहे. देशाच्या आणि महाराष्ट्राच्या समृद्ध वारशात महिलांचे योगदान अमूल्य आहे. स्वातंत्र्यलढा असो किंवा सामाजिक सुधारणा, महिलांनी नेहमीच महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत केले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात महिला सशक्तीकरण आणि त्यांच्या योगदानावर भाष्य करताना त्यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा उल्लेख केला. महिलांचे योगदान केवळ एका दिवसापुरते मर्यादित नाही शिंदे महिला सशक्तीकरणाच्या अनुषंगाने बोलताना शिंदे यांनी सरकारच्या विविध उपक्रमांची माहिती दिली आणि महिलांसाठी राबवलेल्या योजनांवर प्रकाश टाकला.

छत्रपती शिवाजी महाराज हे आदर्श शासक होते, तसेच अहिल्याबाई होळकर या महिला राज्यकर्त्यांमध्ये सर्वोत्तम होत्या. त्यांनी आपल्या कारकिर्दीत रस्ते, पूल, विहिरी आणि तलाव यांसारखी विकासकामे केली आणि जनतेसाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या.

महिला दिन साजरा करण्यापेक्षा महिला वर्ष, महिला दशक आणि महिला शतक साजरे करण्याची आवश्यकता आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. महिलांचे योगदान हा केवळ एका दिवसाचा विषय नाही. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांना सतत प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### आईच्या नावाचा सन्मान ऐतिहासिक निर्णय

महिला सन्मानाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल उचलत सरकारने व्यक्तीच्या नावाच्या पुढे आईचे नाव लावण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय महिलांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेला दिलेली खरी दाद आहे. समाजात स्त्रीचा सन्मान वाढवण्यासाठी आणि मातृत्वाला योग्य मान्यता देण्यासाठी हा मोठा बदल ठरणार आहे, असे शिंदे यांनी नमूद केले.

### महिला सशक्तीकरणासाठी सरकार कटिबद्ध

महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या सक्षमीकरणासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार करत शिंदे यांनी महिलांसाठी सुरू असलेल्या विविध योजनांचे महत्त्व अधोरेखित केले.

महिला सबलीकरणाच्या दिशेने अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. महिलांसाठी शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सुरक्षितता यासारख्या क्षेत्रांमध्ये सरकार अधिक कार्यरत आहे, असे त्यांनी सांगितले.

### महिला दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी विशेष उपक्रम

महिला दिनानिमित्त राज्य सरकारकडून विविध उपक्रम राबवले जाणार असल्याची घोषणाही शिंदे यांनी केली. महिला सबलीकरणाच्या दिशेने आणखी ठोस पावले उचलली जातील आणि महिलांच्या सन्मानासाठी तसेच त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठी सरकार सदैव कटिबद्ध राहील, असेही त्यांनी सांगितले.

### महिला सक्षमीकरणाच्या दिशेने सरकारचा पुढाकार

महिला सशक्तीकरण हे केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरणे गरजेचे आहे. याच उद्देशाने महिला धोरण अधिक प्रभावी करण्यासाठी सरकार विशेष योजना आणणार आहे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. या निर्णयांमुळे महिला सबलीकरणाला अधिक बळ मिळेल आणि महिलांच्या हक्कांना अधिक संरक्षण मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# महापालिका निवडणुकीच्या तयारीला लागा खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांचे पदाधिकाऱ्यांना निर्देश

**शिवसंवाद दौऱ्यात पक्ष संघटनेच्या कामकाजाचा आढावा**

**उद्या दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघात बैठकांचे आयोजन**

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ९: आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) पक्षसंघटनेच्या तयारीला लागला आहे. पक्षाची निवडणूकपूर्व तयारी जाणून घेण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मुंबईत शिवसंवाद दौऱ्याचे आयोजन केले आहे. या दौऱ्याअंतर्गत आज अंधेरी येथे मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यात आली.

अंधेरीतील मातोश्री क्लब येथे झालेल्या बैठकीत मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघातील विधानसभानिहाय पदाधिकाऱ्यांसोबत पक्षसंघटनेची स्थिती, आगामी रणनीती आणि कार्यकर्त्यांचे संघटन याविषयी चर्चा झाली. शाखा प्रमुख, विभाग प्रमुख आणि इतर पदाधिकाऱ्यांकडून प्रभागनिहाय कामाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत स्थानिक पातळीवरील परिस्थितीचा अहवाल तयार करून तो पक्षप्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर केला जाणार आहे, अशी माहिती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली. यावेळी त्यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यातील मतदारसंघात घेतलेल्या जनसंवाद दौऱ्याचा पक्षाला कसा फायदा झाला, याचा उल्लेख केला. अशाच प्रकारे महापालिका निवडणुकीतही स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांशी संवाद वाढवणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

### दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघात उद्या बैठक

महापालिका निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून उद्या, ४ मार्च रोजी दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक होणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

### पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

या बैठकीला खासदार रविंद्र वायकर, माजी खासदार राहुल शेवाळे, आमदार मुरजी पटेल, शिवसेना नेत्या मीनाताई कांबळी, पक्ष सचिव किरण पावसकर, भाऊसाहेब चौधरी, सिद्धेश कदम, उपनेते संजय निरुपम, उपनेत्या शीतल म्हात्रे, कला शिंदे आणि शायना एनसी यांच्यासह अनेक वरिष्ठ पदाधिकारी आणि स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. शिवसंवाद दौऱ्यातून महापालिका निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांचे संघटन बळकट करण्यावर भर दिला जात आहे. पक्षाची रणनीती अधिक मजबूत करण्यासाठी स्थानिक नेतृत्व आणि कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क साधला जाणार असल्याचे डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

# पीएमपीच्या जागेत थांबणार खासगी बस? महापालिकेचा प्रस्ताव काय?




पुणे : शहरातून बाहेरगावी जाणाऱ्या खासगी बस रस्त्यांवर थांबत असल्याने होणारी वाहतूककोंडी सोडविण्यासाठी या बस पीएमपीच्या डेपोत ठरवीक वेळेत थांबण्यासाठी परवानगी द्यावी, असा प्रस्ताव पुणे महापालिकेकडून पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडकडे (पीएमपीएमएल) पाठविण्यात येणार आहे. शहरातून बाहेरगावी जाणाऱ्या खासगी बस रस्त्यावर थांबतात. त्यामुळे होणारी वाहतूककोंडी सोडविण्यासाठी त्यांना पीएमपी डेपोत ठरावीक वेळेत थांबण्यासाठी परवानगी द्यावी, असा प्रस्ताव आहे. शहरातून विविध जिल्ह्यांमध्ये जाणाऱ्या खासगी बस सकाळी, सायंकाळी, तसेच रात्रीच्या वेळी रस्त्यावरच थांबलेल्या असतात. त्यामुळे होणारी कोंडी टाळण्यासाठी महापालिकेने हा प्रस्ताव तयार करून पीएमपी प्रशासनाकडे पाठविण्याचे निश्चित केले आहे. या सर्व खासगी बसचा प्रवास शहरातील वेगवेगळ्या भागांतून होतो. काही बस कात्रज-देहूरोड बाह्यवळण मार्गाने कात्रजवरून स्वारगेटला येतात. त्यानंतर हडपसरवरून सोलापूर, नांदेड, लातूरकडे जातात. तर काही बस गणेशखिंड रस्ता, शिवाजीनगर, वाकडेवाडी, संगमवाडी, नगर रस्त्यावरून मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रात जातात. शहरातील प्रमुख रस्त्यांवर प्रवाशांना घेण्यासाठी या बस जागोजागी थांबतात. पौड रस्ता, वाकडेवाडी, शिवाजीनगर, स्वारगेट चौक, नगर रस्त्यावर या बस थांबत असल्याने वाहतूककोंडी होते. बाहेरगावी जाणाऱ्या खासगी बसना रस्त्याच्या कडेला उभे राहू न देता, शहरातील मोकळ्या जागांवर थांबण्याची परवानगी दिल्यास ही कोंडी टाळता येईल.

# उरणमधील शालेय विद्यार्थी अंमली पदार्थांच्या विळख्यात? निर्मनुष्य आणि सार्वजनिक उद्यान परिसरात व्यसनाचे झुरके



उरण, दि. ९: तालुक्यातील शहर आणि ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थी अंमली पदार्थाच्या विळख्यात अडकत चालला आहे. शाळा, महाविद्यालयांच्या५०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करण्यास मनाई आहे. तरीही या पदार्थांची सर्रास विक्री केली जात असल्याने अल्पवयीन शालेय विद्यार्थी नशेच्या आहारी जाऊन त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. यातील अनेक विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. त्यामुळे अनेक कुटुंब तणावाखाली आहेत. आपल्या व्यसनासाठी मुलांकडून घरात चोरी आणि पालकांना धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. यात काही पालकांनी मुलांना दिलेले अति आर्थिक स्वातंत्र्यही कारणीभूत ठरत आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते संजय ठाकूर यांनी उरणच्या आमसभेतही आवाज उठला आहे.


# महिला सशक्तिकरणाला नवा आयाम सभापती राम शिंदे

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ९: पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी जनकल्याणकारी योजना राबवून समाजातील दुर्बल घटकांना मदत केली. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महिलांच्या सर्वांगीण विकासावर शासनाचा भर आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी शुक्रवारी जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणादायी कार्याचा संदर्भ देत महिलांच्या सबलीकरणावर भर दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. महिला सशक्तिकरणावर विधान परिषदेत सादर करण्यात आलेल्या विशेष प्रस्तावाला सर्वपक्षीय सदस्यांनी पाठिंबा दिला, तसेच महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव केला.

### महिला सबलीकरणासाठी शासनाच्या विविध योजना

सभागृहात बोलताना राम शिंदे यांनी अहिल्यादेवींनी समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा उल्लेख करत, महिलांनी कर्तृत्वाच्या उच्च शिखरावर पोहोचावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. अहिल्यादेवी होळकर यांनी महिला सशक्तिकरणाच्या दिशेने अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. त्यांनी सैन्यात महिलांची तुकडी तयार केली, शेतकऱ्यांना करमाफी दिली, सिंचनासाठी तलाव आणि विहिरी बांधल्या, दुर्लभ ग्रंथांचे हस्तलिखित जतन केले, विद्यासागर आणि ज्ञानदानाचा पुरस्कार केला, सतीप्रथेचा विरोध करत महिलांना संपत्तीतील हक्क मिळवून दिला, पर्यावरण रक्षणासाठी नदी प्रदूषण रोखण्याचे धोरण आखले आणि वनसंवर्धनासाठी कार्य केले. अहिल्यादेवींच्या न्यायदान




प्रणालीचा अनेक राज्यांनी गौरव केला असून, त्यांच्या राज्यात रयतेच्या कल्याणावर भर देण्यात आला होता.

### महिलांच्या सुरक्षेसाठी प्रभावी धोरणांची गरज नीलम गोऱ्हे

विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनीही या प्रस्तावाला पाठिंबा दिला आणि महिलांच्या सुरक्षेसाठी तसेच न्यायहक्कांसाठी अधिक प्रभावी धोरणे राबवण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

### अहिल्याबाई होळकर यांचे आदर्श राज्य पुन्हा यावे अंबादास दानवे

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी महिलांच्या सशक्तिकरणा संदर्भात भाष्य करत, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या आदर्श राज्याची आजच्या काळातही गरज असल्याचे सांगितले. तसेच, त्यांनी महिलांच्या सुरक्षितते वर सत्ताधाऱ्यांना सवाल केला. महिला मंत्र्यांना अश्लील फोटो पाठवण्याच्या घटनेवर सरकार गप्प आहे. अणुशक्तीनगरमध्ये ६५ वर्षांच्या महिलेवर ३५ वर्षीय इसमाने बलात्कार केला. स्वारगेटच्या घटनेत पीडितेच्या चारित्र्यावरच शंका घेतली गेली. मेळघाट येथे महिलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

जव्हार येथे प्रसूती दरम्यान १२ महिलांचा मृत्यू झाला. या सर्व घटनांचा उल्लेख करत महिला सुरक्षेच्या मुद्द्यावर सरकारने जबाबदारी घेतली पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. महिला सशक्तिकरणासाठी सर्वांगीण प्रयत्नांची गरज विधान परिषदेत मांडलेल्या या विशेष प्रस्तावामुळे महिला सशक्तिकरणासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली. सर्वच पक्षांच्या सदस्यांनी महिलांच्या हक्कांसाठी एकत्र येण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. महिला सबलीकरणासंबंधी सरकार विविध योजना राबवत असले तरी महिलांच्या सुरक्षिततेबाबत अधिक ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचे मत बहुसंख्य सदस्यांनी मांडले.

■ दोनशे किलोमीटरचा परिसर, घाटवळणाचे दुर्गम रस्ते अन श्वापदाची भीती ■

# चिखलदरा तालुक्यात कशी अबाधित राखावी कायदा-सुव्यवस्था?

## ग्रामस्थांसह पोलिसही झाले त्रस्त

**मारोती पाटणकर**

**चुरणी( दि.९ )-** विदर्भाचे नंदनवण म्हणून ज्याला संबोधले जाते, अशी पर्यटननगरी चिखलदरा देश, विदेशातही ओळखला जातो. प्रफुल्लीत वातावरणात देश-विदेशातील पर्यटक हजारोच्या संख्येने या पर्यटन नगरीमध्ये येत असतात. गर्दीमूळे शहरात घडणाऱ्या विविध घटना आणि दुर्गम खेड्यापाड्यात हादरवून टाकणाऱ्या घटनांना दसरी नोंद घेत कारवाहीकरिता चिखलदरा पोलीस धावत असतात. या चिखलदरा पोलीसांचे धावणे इतर पोलीस स्टेशनच्या तुलनेत अत्यंत जोखमीचे आणि जबाबदारीचे आहे. त्यामूळे चिखलदरा पोलीस स्टेशनला पोस्टींग ही 'शिक्षा' तर नाही ना! असे, पोलीस कर्मचाऱ्यांना वाटते. रस्त्याच्या नावावर दगडधोंडे, गावाच्या नावावर जंगल, आणि कोणत्या वळणार पुढे मृत्यू वाढून ठेवला आहे, याची खात्री नाही. फक्त नक्षलवाद जर वगळला तर गडचिरोली आणि चिखलदरा यातील पोस्टींगमध्ये फारसा फरक येथील पोलीस कर्मचाऱ्यांना वाटत नाही. रक्तासाठी तहानलेले श्वापद येथे स्वछंद फिरत असतात, एखाद्या घटनेचा तपास करायला जावे म्हटले तर पहाटेच्या सुर्यकिरणाबरोबर निघावे लागते, आणि रात्रीच्या काळकुट्ट अंधारात परतावे लागते. असा दिडशे ते दोनशे किलोमीटरचा चिखलदरा पोलीस स्टेशनअंतर्गत येणारा परिसर आहे. अश्या परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था अबाधित कशी राखावी असा प्रश्न आता खाकीतल्या रक्षकाला पडत आहे.

नावाखाली चिखलदरा पोलीस स्टेशन अंतर्गत अंधश्रध्देच्या रेहट्याखेडा येथे घडलेली निषधार्ह घटना असो किंवा अघोरी उपचाराच्या नावावर बाळाला दिलेले चटके असो, या घटनांनी दाखवून दिले की, आजही चिखलदरा तालुका हा इतर तालुक्यांपेक्षा 15 ते 20 दिवस उशिरा चालत आहे. याचे कारण पाहीले तर तेच जाणवेल दुर्गम परिसर आणि मोबाईलला नसलेली रेंज. रेहट्याखेडा प्रकरणात घटनेची गंभीरता न कळू शकल्याने तत्कालीन ठाणेदारांसह काही कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाही ओढवून घ्यावी लागली. रेहट्याखेडा ते चिखलदरा हे अंतर जवळपास 100 किलोमीटर असल्याने कदाचित या पोलीसांना घटनेची गंभीरता कळू शकली नाही, त्यांना वेळीच घटनास्थळ गाठता आले नाही. पोलिसांकडेसुध्दा ही तक्रारदार पाच दिवसांनी पोहोचली, इतके दुर्दैव.






- हिवाळ्यात विशेषत: पावसाळ्यात पर्यटकांची झुंबड उठत असल्याने घाटवळणांमध्ये अनेक अपघात होतात.
- मद्यप्राशन करणारे पर्यटक येथे धिंगाणा घालतात त्यामूळे अनेकदा हाणामारीसारखे प्रकार होतात.
- अवैध गोवंश वाहतूक, गुटखा वाहतुकीचे आव्हान सदानित असते.
- विविध जंगलविषयक घटना पुढे येत असतात, ज्यामध्ये कारवाहीमध्ये वनविभागसोबत पोलीसांचाही सहभाग तेवढाच असतो.

### दिडशे किलोमीटरमध्ये दोन पोलीस स्टेशन हवे!

चिखलदरा व्यक्तीरिक्त एक आणखी पोलीस स्टेशन या परिसरात असणे अत्यंत गरजेचे झाले आहे. दिडशे ते दोनशे किलोमीटरच्या या अंतरामध्ये चिखलदरा पोलीस स्टेशनवरिल जास्तीत जास्त ग्रामीण भागाचा भार कपात करुन तो अन्य एका पोलीस स्टेशनवर देणे गरजेचे आहे. वारंवार अतिसंवेदनशील घटना उघडकीस येत असल्याने आता याची गरज भासायला लागली आहे.



"आतापर्यंत आम्हाला चिखलदरा पोलीस स्टेशन व्यतीरिक्त आणखी एक पोलीस स्टेशन असावे अशी गरज वाटली नसावी, मात्र आता तेथील लोकसंख्या, अंतर इत्यादी नियमांची चाचपणी करुन तसा प्रस्ताव बांधकाम विभाग, गृहविभागाला पाठविण्याचा प्रयत्न आम्ही करु.

**-विशाल आनंद सिंगुरी,**
**पोलीस अधीक्षक ग्रामीण अमरावती.**

### सरमसपुऱ्याप्रमाणे व्हावे विलगीकरण

संवेदनशील असलेल्या अचलपूर शहराला तत्कालीन आमदार बच्चू कडू यांच्या प्रयत्नातून सन 2009 मध्ये दुसरे पोलीस ठाणे मिळाले. त्यांच्या सततच्या पाठपुराव्याने तब्बल 83 वर्षांनंतर सरमसपुरा पोलीस ठाण्याचे पुनर्जिवित झाले होते, यासाठी तेव्हा 6 कोटी 56 लाखांचा निधी उपलब्ध करवून देण्यात आला होता. 22 ऑक्टोबर 2007 रोजी अचलपूर शहरात तणाव निर्माण झाला होता. दरम्यान तत्कालीन गृहमंत्री आर.आर. पाटील अचलपूर शहरात आले असता त्यांच्यापुढे दुसऱ्या पोलीस ठाण्याची मागणी तत्कालीन आमदार बच्चू कडू यांनी ठेवली होती. यावर शासनाने अचलपूर पोलिसांकडून सविस्तर प्रस्ताव शासनाने मागविला. निर्धारित लोकसंख्या, येणारी धार्मिक स्थळे, लोकांची जातीनिहाय विभागणी आणि समाविष्ट करता येणाख्रया मोहल्ल्यांची माहिती देत अचलपूर शहरातील सरमसपुऱ्यात नवे पोलीस ठाणे प्रस्तावित केल्या गेले आणि शासनाने त्याला मान्यताही दिली. सन 2009 मध्ये सरमसपुरा पोलीस ठाण्याकरिता एक पोलीस निरीक्षक, दोन उपनिरीक्षक, 20 हवालदार आणि 40 पोलीस कर्मचारी शासनाने मान्य केलेत. सन 2001 च्या जनगणनेनुसार 30 ते 35 हजार लोकसंख्या विचारात घेतल्या गेली. सरमसपुऱ्यासह मेहराबपुरा, नवबागपुरा, सुलतानपुरा, मंजूरपुरा, रायपुरा, सवईपुरा, नशीबपुरा, जोगीपुरा मिळून अचलपूर शहरातील 12 ते 15 पुरे (मोहल्ले) या नव्या पोलीस ठाण्यांतर्गत समाविष्ट केल्या गेले. या नव्या पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रक, त्याचा आराखडा सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूरने बनवून गृहविभागाकडे सादर केला. दरम्यान प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाली; प्रत्यक्षात मात्र निधी उपलब्ध झाला नाही. यात भाड्याच्या घरातून सरमसपुरा पोलीस ठाण्याचा कारभार सन 2014 पर्यंत सुरू होता. यावर तत्कालीन आमदार बच्चू कडू यांनी शासन दरबारी पाठपुरावा करीत पोलीस स्टेशनच्या प्रशासकीय इमारतीकरिता 56 लाखांचा, तर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाकरिता 6 कोटींचा निधी खेचून आणला होता.

# कारचा भीषण अपघात : 1 ठार, 3 गंभीर

## आष्टगाव-अंबाडा मार्गावरील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.९)** - चालकाचे नियंत्रण सुटुन भरधाव कार रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जावून आदळल्याने घडलेल्या अपघातात एक जण ठार तर कारमधील अन्य तिघेजण गंभीररीत्या जखमी झाले. आष्टगाव-अंबाडा मार्गावर शनिवारी रात्री 9 वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. रुपेश यशवंतराव इंगोले (34, रा. जळका हिरापूर ता. भातकुली) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या युवकाचे नाव आहे. गजेंद्र अनिल चरपे (32, रा. कुर्हाग ता. चांदूरबाजार), यश प्रकाश बोरवार (21, रा. कुर्हाव ता. चांदूरबाजार) आणि देवेंद्र थोरात (रा. गोराळा ता. मोर्शी) हे जखमी झाले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

मोर्शी येथील दुर्गानगर भागातील रहिवासी भारत फायनान्समध्ये कार्यरत असणारे शाखा व्यवस्थापक गजेंद्र अनिल चरपे हे त्यांचे सहकारी रुपेश इंगोले, यश प्रकाश बोरवार आणि देवेंद्र थोरात यांच्यासह कंपनीच्या कामाकरिता चरपे यांच्या कार (क्रमांक - एमएच 27 / डीएल 3164) ने अंबाडा येथे गेले होते. तेथून काम आटोपून मोर्शीला परत येत असतांना अंबाडा-आष्टगावदरम्यान रस्त्यावर असलेल्या एका वळणदार ठिकाणी भरघाव वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जावून जोरदार आदळली. या अपघातात रुपेश इंगोले याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर अन्य तीनजण जखमी झाले. जखमींना अंबाडा येथील युवकांनी तात्काळ मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यापैकी यश बोरवार हा गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले.

## चाकुचा धाकावर चोरली 2.88 लाखांची रोख

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, (दि.९)**-चाकुचा धाक दाखवून एका तरुणाजवळील 2 लाख 88 हजाराची रोख व दोन मोबाईल अज्ञात चोरट्यांनी बळजबरीने लुटून नेले. ही घटना धामणगाव रेल्वे रोडवरी रामगावाजवळ 9 मार्च रोजी सकाळी उघडकीस आली. साई स्टोन क्रेशर येथे दिवाणजी असणारे निलेश शेषराव चापले हे सकाळच्या वेळेस चुकाराचे पैसे घेऊन जात होते. दरम्यान धामणगाव रोडवर रामगाव समोर दोन अज्ञात इसमानी त्याला अडविले. त्यानंतर त्यांनी चाकूचा धाक दाखवून त्याच्याकडील पैशाची पिशवी व दोन मोबाईल बळजबरीने हिसकाविले. या घटनेनंतर निलेश यांनी दत्तापूर पोलिसात धाव घेऊन तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून दत्तापूर पोलिसांनी अज्ञात दोन चोरट्या विरोधात गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढील तपास दत्तापूर पोलीस करीत आहे.

# कुलुप फोडणारा चाबी विक्रेता करायचा रेकी

## ■राजापेठ पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.९ )** - कुलुपाची चाबी विकण्याची बतावणी करीत बंद घरांना लक्ष्य करणाऱ्या एका कुख्यात चोराला राजापेठ पोलिसांनी 8 मार्च रोजी अटक केली. तेजपालसिंग निहालसिंह भाटीया (35, रा.सुरज, गुजरात) असे आरोपीचे नाव आहे. आरोपीने राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रविनगरात केलेल्या घरफोडीची कबुली दिली. तेजपालसिंह भाटीया हा मुळचा गुजरात राज्यातील असून, तो विविध शहरात फिरून चाबी विकण्याचा बहाणा करून नागरिकांच्या घराची रेकी करीत होता. 29 डिसेंबर 2024 रोजी रविनगरातील रहिवासी खेडकर यांच्या घरात अज्ञात चोराने चोरी करून मोबाईल, चांदीचे दागिने व दहा हजाराची रोख लंपास केली होती. दरम्यान त्यांच्या घरासमोरील दुसरे घर सुध्दा फोडण्यात आले होते. या घटनेच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला होता. या गुन्ह्याचा तपास राजापेठ पोलिस करीत होते. दरम्यान पोलिसांनी गुप्त माहिती व तांत्रिक तपास करून आरोपी निष्पन्न केला. त्यानंतर पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, राजापेठचे पोलिस निरीक्षक पुनिट कुलट यांच्या मार्गदर्शनात डीबी पथक प्रमुख पोलिस हवालदार मनिष करपे, पंकज खटे, सागर बजगवरे, रवि लिखितकर यांच्या पथकाने बुलढाणा जाऊन आरोपी तेजपालसिंगला मोठ्या शिताफीने अटक केली. त्याला 8 मार्च रोजी अमरावतीत आणले गेले. त्याची जिल्हा सामान्य रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. आरोपी तेजपालसिंग हा सुरतवरून निघाल्यानंतर नागपूर, अकोला, रामटेक अशा आदी शहरात फिरून चाबी बनविण्याचा बहाणा करीत फिरत होता. तो दारोदारी फिरून नागरिकांच्या घराच्या कुलुपाच्या चाब्या बनवून देत होता. अशातच तो रेकी करून बंद घरांना लक्ष्य करायचा. त्यानंतर तो मध्यप्रदेशातील एका नातेवाईकाच्या घरी जाऊन राहत होता आणि तेथे चोरीचा मुद्देमाल विकत होता. ही बाब पोलिस चौकशीत पुढे आली आहे. तो अमरावती येण्यापूर्वी रामटेक व नागपूरात होता. त्याने नागपूरात दोन दुचाकी चोरल्याचीही कबुली दिली आहे.

## मंगरुळ दस्तगिर हद्दीत तरुणीचा विनयभंग

**अमरावती** - मंगरुळ दस्तगिर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका तरुणीचा विनयभंग करण्यात आला. पिडित तरुणीने या घटनेची तक्रार 6 मार्च रोजी मंगरुळ दस्तगिर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी मोहन अंबादास उमाडे (24, रा. झाडा, धामणगाव रेल्वे) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या घटनो पुढिल तपास मंगरूळ दस्तगिर पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस कर्मचारी करीत आहे.

# होळी साठी जिल्हाभरातील पोलीस अलर्ट

### कायदा व सुव्यस्थेकरिता विशेष गस्त



*महासागर प्रतिनिधी*

***अमरावती,( दि.९ ) - रंगपंचमीच्या पर्वावर मद्याने भरलेल्या ग्लासाला ग्लास लावून दुचाकीवर हवेसोबत गोष्टी करणाऱ्या सळसळत्या रक्ताला नियत्रणात ठेवण्याकरिता जिल्हाभरातील पोलीस अलर्ट मोडवर आले आहेत. कायदा व सुव्यस्थेकरिता विशेष गस्त वाढविण्यात आली आहे.***

13 मार्च रोजी होळी सण व थाटामाटात आणि उत्साहात साजरा केला जाणार आहे. या दिवशी काही अप्रिय घटना होऊ नये, यासाठी पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले असून, पोलिसांच्या सरंक्षणात होळीचा सण साजरा होणार आहे. यंदाही महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन, दामिनी पथक महिला सुरक्षेसाठी तैनात राहणार आहे. पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनात शहर पोलिस आयुक्तालयातील दहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांची बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे.

### धुमाकुळ घालणाऱ्यांच्या मुसक्या आवळणार

होळी व रंगपंचमीला काही टवाळखोर मद्यधुंद अवस्थेत रस्त्यावर धुमाकुळ घालत फिरतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा लोकांवर पोलिस करडी नजर ठेऊन राहणार आहे. मद्यधुंद अवस्थेत रस्त्यावर धुमाकुळ घालणार्यांना पोलिसांकडून कडक कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे धुमाकुळ घालणार्यांची खैर नाही, असे दिसून येत आहे. या अनुषंगाने पोलिसांची विविध पथके रस्त्यावर गस्त लावून अशा लोकांवर लक्ष ठेवणार आहे.

### बाजारपेठेत होळी, रंगपंचमीच्या खरेदीसाठी लोकांची गर्दी

13 मार्च रोजी होळी आणि 14 मार्च रोजी रंगपंचमी आहे. त्यामुळे अमरावतीकरांमध्ये या सणाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. होळी सणानिमीत्त बाजारपेठेत खरेदीदारांची गर्दी वाढु लागली आहे. तर रंगपंचमीसाठी पिचकार्यासह गाठी विक्रीची दुकाने सजली आहे.

### अट्टल गुन्हेगारांची धरपकड

शहरात गेल्या काही दिवसात दोन हत्येच्या घटना पुढे आल्या आहेत. त्यामुळे होळी सणानिमीत्त कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचू नये, यासाठी पोलिसांनी यंदा बंदोबस्त वाढविला आहे. त्यातच पोलिसांनी रेकॉर्डवरील आरोपी व हिस्ट्रीसिटरवर लक्ष केंद्रीत करून, त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई सुरु केली आहे. गुन्हेगारांना समज देण्यात येणार आहे. याशिवाय होळीच्या वेळी त्यांना डिटेन सुध्दा केले जाण्याची शक्यता आहे.



"होळी सणानिमीत्त कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. दारु पिऊन धुमाकुळ घालणार्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. नागरिकांनी होळी सण शांततेत व आनंदात साजरा करावा. या कार्यक्रमासाठी डिजेची परवानगी आवश्यक राहील. नियमांचे उल्लंघन करणार्यांना सोडले जाणार नाही. कुणीही कायदा हातात घेऊ नये, अन्यथा पोलिसांकडून कठोर कारवाई केली जाईल.

**नवीनचंद्र रेड्डी,**
**पोलिस आयुक्त, अमरावती शहर.**


## AGRICULTURAL PRODUCE MARKET COMMITTEE, CHANDUR BAZAR DISTRICT AMRAVATI

## TENDER NOTICE

Online percentage rate tenders in B-1 Form are invited by the Chairman/Secretary, APMC CHANDUR BAZAR for the following work from experience contractor. The name of work, estimated cost, earnest money, security deposit, time limit for completion etc. are as under.

| Sr. No. | Name of Work | Amount Put to Tender | Tender Fee | EMD | Period for Downloading Tender Forms | Bid Submission Date | Pre Bid Meeting | Time limit of Calendar Months |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Construction of 100 MT Weigh Bridge with Cabin at Main Yard of APMC Chandur Bazar. | 33,48,490/- | 590/- including GST | 34,000/- | 10-03-2025 to 24-03-2025 up to 12.00 pm | 24-03-2025 up to 12.00 pm | Not Applicable | 6 Months including monsoon |

Detailed Tender form, conditions of contract, specifications and contract drawings can be downloaded from the Tendering portal of Government of Maharashtra i.c. www.mahatenders.gov.in after entering the details payment of Tender Fee should paid Online through e-payment gateway mode or NEFT/RTGS or in the form of Demand Draft in favour of Chairman, APMC Chandur Bazar. The Payment shall be adjusted against as Tender Fees and it will be non refundable. Further information regarding the work is obtained from the above office.

The Tender fees and EMD should be paid Online or NEFT/RTGS through e-payment gateway mode or in the form of Demand Draft in favour of Chairman, APMC Chandur Bazar. Bids will be opened as per Tender Schedule.

**Shri. Satish Mohod** Chairman | **Shri Vinod Raut** Vice Chairman | **Shri. Manish Bharambe** Secretary | **AS Architects, Amravati. Ar. Shraddha A. Jagtap (Sagane)** Architect



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# लाडकी बहीण योजना फसवी?

## सरकारकडून फसवणूक झाल्याची ओरड

### लाडक्या बहीणीमुळे वृद्ध कलावंत चीत

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, (दि. 9)** - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत लाभार्थी महिलांना 2100 रुपये देण्याचे आश्वासन महायुतीने दिले असले तरी जाहीरनामा पाच वर्षांसाठी असतो, असे सांगत योग्यवेळी अनुदानात वाढ करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे वक्तव्य महिला व बालकल्याणमंत्री अदिती तटकरे यांनी केले. आता यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी लाडकी बहीण योजना फसवी आहे, असे म्हणत



जोरदार हल्लाबोल केलाय. तर लाडकी बहीण योजना आल्यापासून वृद्ध कलाकारांचे मानधन मिळालेले नाही, असा दावा देखील त्यांनी केलाय. जागतिक महिला दिनला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत महिलेसोबत एक कार्यक्रम ठेवला आहे. म्हणजे आम्ही कसे महिलांचे रक्षक आहोत, आम्ही कशी महिलांची काळजी घेतो, अशा प्रकारचे कार्यक्रम घेऊन नक्की प्रसिद्ध दिली जाते. पण महाराष्ट्राची जर अवस्था आपण काही महिन्यात पाहिली तर राज्यात होणारे अत्याचार देशात सर्वाधिक आहेत. मंत्री त्याच्यामध्ये सामील आहेत. सरकारी पक्षाचे लोक सामील आहेत. पोलिसांवरती दबाव आणला जातो. लाडकी बहीण सारख्या योजनेच्या माध्यमातून पंधराशे रुपये तुम्हाला दिले म्हणजे महिला सुरक्षित आहेत आणि आम्ही महिलांचे हितरक्षक आहोत. या भूमिकेत जर सरकार असेल तर सरकार समस्त महाराष्ट्राची आणि महिला वर्गाची फसवणूक करत आहे, असा हल्लाबोल संजय राऊत त्यांनी केलाय.

ही महिलांची फसवणूकअसुम लाडकी बहीण योजना ही सुद्धा किती फसवी आहे हे आपण निवडणुकीनंतर पाहिले. लाडक्या बहिणींना निवडणुकीनंतर ताबडतोब 2100 रुपये देणार होते. संबंधित खात्याच्या जा मंत्रिबाई आहेत, त्या देखील महिलाच आहेत. त्यांनी ते शक्य नाही सांगितले. ही महिलांची फसवणूक आहे, असेही त्यांनी म्हटले.

#### वृद्ध कलाकारांचे मानधन मिळालेले नाही

मला काल काही वृद्ध कलाकार भेटले. त्यांना सरकारतर्फे महिन्याला एक ठराविक मानधन मिळते. त्यांनी सांगितलं की, लाडकी बहीण योजना आल्यापासून वृद्ध कलाकारांचे मानधन मिळालेले नाही. काल जो आर्थिक पाहणी अहवाल आलेला आहे. त्याच्यावरच बोट दाखवून हे राज्य कर्जाच्या ओजाखाली चिरडत आहे. 2100 रुपये द्यायचे कबूल केले आहे. मग ही योजना फसवी नाही का? या सरकारने महिलांना 2100 देऊ, असे सांगितले आणि आता ते पैसे द्यायला तयार नाही, असेही संजय राऊत यांनी म्हटले.

## वर्षा वाधवानींच्या मरणोत्तर नेत्रदानाने दृष्टिहिनांना दृष्टीलाभ

### महिला दिनाच्या पुर्वसंध्येला हरिना नेत्रदान समितीने केली नेत्रदानाची प्रक्रिया



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, (दि.9)**- शहरातील वर्षा जागोसेठ वाधवानी (57 वर्ष) या महिलेच्या मरणोत्तर नेत्रदानामुळे दोने दृष्टिहिनांना दृष्टीलाभ मिळाला आहे. त्यांच्या मृत्युनंतर नेत्रदानामुळे दोन अंधव्यक्तींचे जिवन प्रकाशमय झाले आहे.



शहरातील सिंधी कॅम्पस्थित प्रतिष्ठीत रहिवासी जागोसेठ वाधवानी यांच्या पत्नी वर्षा वाधवानी यांचे 7 मार्च रोजी सायंकाळच्या दरम्यान दुखन्द निधन झाले. मृत्युपुर्वी वर्षा यांनी नेत्रदानाचा संकल्प केला होता. अशातच मृत्युनंतर याबाबतची माहिती वाधवानी परिवारातर्फे हरिना नेत्रदान समितीचे वरिष्ठ सदस्य सुरेश जैन यांना देण्यात आली. यानंतर त्यांनी लगेच याची माहिती मनोज राठी यांना दिली असता अवघ्या काही वेळातच हरिना समितीची चमु वाधवानी परिवाराच्या घरी पोहचली. रात्री 11.30 वाजता नेत्रदानाची प्रक्रीया पुर्ण करण्यात आली. हरिना समितीतर्फे मनोज राठी, शरद कासट, डॉ. मोनिका उमक, सामान्य रुग्णालयाचे डॉ. सुनील यावल, अच्युत टाके, निलेश ढेंगले यांच्याद्वारा नेत्रदान प्रकिया पुर्ण केल्या गेली. मृत्युपश्चात सामाजिक बांधिलकी जपत नेत्रदान केल्यामुळे हरिना समितीतर्फे वाधवानी परिवाराचे आभार मानण्यात आले. तसेच परिसरातील सर्व नागरिकांनी नेत्रदानाच्या महान चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन अमरावती येथील हरिना नेत्रदान समितीच्यावतीने करण्यात आले आहे. यावेळी संपुर्ण वाधवानी परिवार व इतर समाजबांधव उपस्थित होते.

## 13 मार्चला 6 वा लोकजागर स्मशान होलिकोत्सव सोहळा

**चांदूरबाजार** - दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही सहावा लोकजागर स्मशान होलिकोत्सव सोहळा, गुरुवारी दि. 13 मार्च ला सायंकाळी 6.30 वाजता संपन्न होणार आहे. हा कार्यक्रम स्थानिक मोर्शी रोड वरील, हिंदू स्मशानभूमीत पार पडणार आहे.या सोहळ्याचे आयोजन अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती,तालुका शाखा चांदूरबाजार व्दारे करण्यात आले आहे. यावेळी सदर सोहळ्यात छत्रपती शिवराय व महापूरूषांच्या जिवनातील वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले आहे. सदर विषयावर यवतमाळ येथील शिवचरित्रकार प्रसिध्द वक्ते,प्रा.प्रविण देशमुख हे सउदाहरण माहिती देणार आहेत. या कार्यक्रमाला दरवर्षी महिलांची वाढती उपस्थिती बघता, यावर्षी कार्यक्रमासाठी स्मशानभूमीत महिलांच्या बसण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तरी तालुक्यातील विचारभेदी नागरीकांनी , कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## अंगावर मिरची पावडर फेकून लोखंडी पाईपने मारहाण

**अमरावती** - गैरकायद्याची मंडळी जमवून एका इसमाच्या अंगावर मिरची पावडर फेकून त्याला लोखंडी पाईपने मारहाण करण्यात आली. या घटनेची तक्रार राजेश दामोधर वानखडे (50, रा. भानखेडा खुर्द) यांनी 7 मार्च रोजी बडनेरा पोलिस ठाण्यात दिली.

त्यानुसार पोलिसांनी आरोपी अमोल अंबादास नितनवरे (30), संजय दुर्येधन नितनवरे व चार महिला (सर्व रा. भानखेडा खुर्द) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. राजेश वानखडेच्या तक्रारीनुसार, फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील असून, त्यांच्यात जुना वाद सुरु आहे. आरोपी हे काहीही कारण शोधून वानखडेंशी वाद करतात. 6 मार्च रोजी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून जुन्या वादाच्या कारणावरून राजेश वानखडेंच्या कुटुंबातील एका महिलेला शिविगाळ केली. त्यानंतर आरोपींनी राजेश वानखडेच्या अंगावर मिरची पावडर फेकून, त्यांच्यावर लोखंडी पाईपने हल्ला केला. त्यानंतर त्यांना पेट्रोल टाकून जाळण्याची धमकी दिली. या घटनेची तक्रार राजेश वानखडेने बडनेरा पोलिसात दिली.

## गरजू विद्यार्थ्यांला सायकल आणि शालेय साहित्य भेट

### महिला दिनानिमित्त माहेश्वरी महिलांचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, (दि.9)**- आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त माहेश्वरी महिला मंडळ, धामणगाव तहसील माहेश्वरी महिला संघटना व बहू-बेटी मंडळातर्फे प्रेरणादायी सेवा कार्य करण्यात आले. या विशेष दिनानिमित्त गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सायकल व शालेय साहित्य भेट देण्यात आल्या.

समाजातील महिलांनी माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सारिका राठी, धामणगाव तालुका माहेश्वरी महिला संघटनेच्या अध्यक्षा उषा राठी व सल्लागार जयश्री राठी व महासंघाचे माजी अध्यक्ष महेश राठी यांच्या हस्ते विद्यार्थी प्रवीण पेढीवाल यांना सायकल व शालेय साहित्य प्रदान केले वारी हितकार संघ मनीष मुंधडा, गोपाळ पेढीवाल यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सारिका राठी, धामणगाव तहसील माहेश्वरी महिला संघटनेच्या अध्यक्षा उषा राठी, सल्लागार जयश्री राठी, माहेश्वरी महिला मंडळाच्या उपाध्यक्षा सीमा मुंढा, सचिव सुनीता मुंढा, खजिनदार चंचल संघटनेचे सदस्य राजेंद्र तांडे, पो.नि श्री मुंधरा, कविता



पेढीवाल आदी उपस्थित होते. सल्लागार जयश्री राठी यावेळी म्हणाल्या, महिला दिन हा केवळ महिलांच्या हक्कांबद्दल बोलण्याचा दिवस नाही, तर तो समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीचा संदेश देतो. शिक्षण हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे आणि आम्हाला या दिशेने सहकार्य करण्यात अभिमान वाटतो. यादरम्यान एका गरजू विद्यार्थ्याला सायकल देण्यात आली, जेणेकरून त्याच्या शाळेला जाण्याचा प्रश्न सोडवता येईल, तसेच शाळेच्या विद्यार्थ्याला इतर साहित्य, दप्तरही देण्यात आले. या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त केला आणि या मदतीबद्दल समाजाचे आभार मानले. यावेळी महिला मंडळाच्या इतर सदस्यांनी यापुढील काळातही असेच सेवा कार्य सुरू ठेवण्याचा संकल्प करत शिक्षणाचा प्रसार व समाजसेवेचा संदेश दिला.

## स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्त्व शासनकर्त्यांना आहे का?

### हर्षवर्धन देशमुख यांचा सवाल | सरपंच - पोलीस पाटील संकल्प कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.9)** - महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यकाळात स्थानिक स्वराज्य संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली.राज्यातील लोकप्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थेतून आले तर त्यांचा अनुभवाचा शासन करताना फायदा होईल.ग्रामपंचायत , जिल्हा परिषद ते विधानसभा असा लोक प्रतिनिधीचा प्रवास निश्चितच राज्यासाठी मार्गदर्शक ठरेल, अशी भूमिका यशवंतराव चव्हाण यांची होती परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्त्व आजच्या शासनकर्त्यांना आहे की नाही, असा प्रश्न यशवंतराव चव्हाण अमरावती सेंटरचे अध्यक्ष तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी उपस्थित केला.

यशवंतराव चव्हाण अमरावती जिल्हा सेंटर आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राच्या वतीने संयुक्तपणे सुशासन युक्त गावासाठी आयोजित सरपंच ङ्क पोलीस पाटील संकल्प कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यशवंतराव चव्हाण अमरावती जिल्हा सेंटरचे कार्याध्यक्ष डॉ.रमेश अंधारे, कोषाध्यक्ष प्रदीप देशमुख, सचिव प्राचार्य डॉ.ए.एल.कुलट, प्राचार्य डॉ.अमोल महल्ले, पोलीस पाटील महासंघाचे राज्य कार्याध्यक्ष राहुल उके, सरपंच संघटनेचे मंगळे यांची प्रामुख्याने उपस्थित होते.

हर्षवर्धन देशमुख पुढे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांच्या



कार्याचे महत्त्व सातत्याने लोकांपर्यंत पोहोचावे म्हणून मा.शरद पवार यांनी यशवंतराव चव्हाण सेंटरची स्थापना केली असून हे निरपेक्ष अशा प्रकारचे महाराष्ट्रातील एकमेव विचार्पीठ आहे.काळासोबत चालण्याची दृष्टी आणि त्या दृष्टीने कार्यक्रम आखून सेवाभाव जपण्यासाठी हे सेंटर कार्य करते.गावागावात गटबाजी असते परंतु लोकांमधून निवडून आलेला सरपंच आणि शासनाने नेमलेला पोलीस पाटील यांनी आपल्या गावातील गटतट सोडून गावाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावे,असे आवाहनही त्यांनी केले. सरपंच आणि पोलीस पाटील यांना एकत्र बसवून विकासाची चर्चा घडवून आणण्याचा महाराष्ट्रातील हा पहिला प्रयोग असल्याचे सेवानिवृत्त उपमुख्य कार्यपालन अधिकारी तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी सचिव शेषराव खाडे हे पहिल्या सत्रात मार्गदर्शन करताना म्हणाले. ग्रामसभेला शासनाने खूप अधिकार दिले असून आपण आपल्या अधिकाराबाबत अनभिज्ञ आहोत.कायद्याबद्धल अज्ञानी आहोत.ग्रामसभा बोलविण्याचा अधिकार केवळ सरपंचाला असून या व अन्य अधिकाराचा वापर करून आपण गावाचा विकास करू शकतो परंतु विकास म्हणजे काय? ही आपली संकल्पना स्पष्ट असली पाहिजे, असेही ते म्हणाले.खाडे यांनी आपल्या भाषणातून ग्रामसभेच्या आणि सरपंच व पोलीस पाटील यांच्या अधिकाराबाबत विविध कायद्यांची व कलमांची माहिती दिली. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ.अमोल महल्ले यांनी आपल्या प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजनामागची भूमिका विशद केली तर यशवंतराव चव्हाण सेंटरचे कोषाध्यक्ष प्रदीप देशमुख यांनी सेन्टरच्या कार्याबाबत माहिती दिली.पिंपरी निपाणी येथील सरपंच योगिता रिठे आणि हनवतखेडा येथील सरपंचाच्या यावेळी सत्कार करण्यात आला.अतुल साबळे यांनी उद्घाटन सत्राचे संचालन व आभार प्रदर्शन केले.

## फत्तेपुरातून बोकूड लंपास

**अमरावती** - वरुड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील फत्तेपुरातून चोराने 24 हजार रुपये किमंतीचे बोकुड चोरून नेले.

या घटनेची तक्रार प्रफुल्ल रमेश चव्हाण (36, रा. फत्तेपूर) यांनी 7 मार्च रोजी वरुड पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढिल तपास वरूड पोलीस करीत आहे.

## पारंपारिक क्रीडा महोत्सवात गोविंदप्रभू औद्योगिक संस्थेचे यश



### फुगडीला विभागीय स्तरावर अजिंक्यपद

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.9)** - कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग या खात्याचे मंत्री मंगल प्रभात लोढा व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई यांच्या संकल्पनेतून पारंपारिक महाकुंभ क्रीडा महोत्सव 1 ते 9 मार्च या कालावधीत पार पडला. त्यामध्ये संस्थास्तरीय, जिल्हास्तरीय व विभागीय स्तरीय अशा स्पर्धा घेण्यात आल्या. मोर्शीच्या गोविंदप्रभू औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मुलांनी सादर केलेल्या फुगडीला विभागीय स्तरावर विजेतेपद प्राप्त झाले.

संस्थेचे प्राचार्य कमलकिशोर फुटाणे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धांसाठी तयरी करण्यात आली होती. त्यामध्ये फुगडी, लगोरी, रस्सीखेच, दंड बैठक, लेझीम व लंगडी अशा स्पर्धा संस्थेमध्ये घेण्यात आल्या. जिल्हास्तरीय स्पर्धेत मुलांची फुगडी व रस्सीखेच मध्ये संस्थेच्या संघाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. मुलांची फुगडी संघ विभागीय स्तरावर प्रथम क्रमांकांनी विजयी झाला. यासाठी संस्थेचे गटनिदेशक व सर्व निदेशक वर्ग यांनी कमी वेळात मुलांकडून सराव करून स्पर्धा यशस्वीरित्या पुर्ण केल्या.

## शिवाजी विद्यालयात कर्तबगार महिलांचा सत्कार



### महिला दिनानिमित्त आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.9)**- श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा संचालित मोर्शीच्या शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शाळेतील शिक्षिका तसेच समाजातील कर्तबगार महिलांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळा निरीक्षक निळकंठ यावले, मोर्शी एसटी बस आगाराच्या व्यवस्थापक आशा वासनिक, प्रा. डॉ. लाजवंती रामटेके, प्रा. वंदना गांजरे, उषा उताणे, उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर, पर्यवेक्षक उद्धव गीद, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी, लता लांडगे उपस्थित होते. शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. महिला दिनानिमित्त शाळेतील सर्व शिक्षकांना मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

तसेच डॉ रामटेके, प्रा. उषा उताणे, आशा वासनिक या महिलांचा यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला. सत्कार झालेल्या महिलांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन राजेश मुंगसे व वर्षा साठवणे यांनी केले. तर आभार प्रदर्शन सचिन खोपडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्चना तराळ, अश्लेषा जाधव, प्रवीणा बहुरूपी, सुषमा गायकवाड, सुषमा बोबडे, धनश्री कोंबे, मोनाली खडसे, हर्शा पाटील, साक्षी गोडबोले, भाग्यश्री ढोले यांनी परिश्रम घेतले.

## अनेक गावांमध्ये विशेष ग्रामसभा झालीच नाही

### महिला व बालविकास मंत्र्यांच्या आदेशाला केराची टोपली

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, (दि.9)** - जागतिक महिला दिनानिमित्त राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा घेण्याचे आदेश महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिले होते. या ग्रामसभेत महिला सक्षमीकरण, बालविवाह रोखण्याचे उपाय, महिलांच्या हक्कांसाठी आवश्यक धोरणे आणि सुरक्षेसाठी उपाययोजना यावर चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र, धामणगाव रेल्वे तालुक्यात बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये ही विशेष ग्रामसभा पार पडलीच नाही. काही ठिकाणी केवळ महिला मेळावे आणि सत्कार समारंभांचे आयोजन करण्यात आले, परंतु ग्रामसभेचे आयोजनच झाले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.



#### ग्रामसभा झाल्या का? अधिकाऱ्यांकडेही माहिती नाही!

तालुक्यातील किती ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा पार पडल्या, याबाबत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (बीडीओ) पाटील यांना विचारले असता, 'माझ्याकडे सध्या तरी कोणतीही माहिती उपलब्ध नाही,' असे त्यांनी सायंकाळी 5:15 वाजता सांगितले. त्यांनी अधिक माहिती मिळण्यासाठी 'दीड तास थांबा,' असे सांगितले. मात्र, दोन तासांनंतर पुन्हा संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही.

#### ग्रामसभेला केवळ चार-पाच लोकांचा प्रतिसाद

तालुक्यातील विरुळ रोघे गावातील सरपंच रूपेश गुल्हाने यांनी सांगितले की, 'आम्ही ग्रामसभा घेतली, मात्र केवळ चार-पाच लोकच उपस्थित होते. ग्रामसेवक सोमवारी आल्यानंतर त्यावर अधिकृत प्रक्रिया केली जाईल.'

#### महिला सक्षमीकरणासाठी ग्रामसभांचे महत्त्व

महिलांच्या हक्कांसाठी लोकचळवळ उभी राहावी, महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी धोरणांची अंमलबजावणी व्हावी आणि त्यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ठोस उपाययोजना राबवल्या जाव्यात, या उद्देशाने या विशेष ग्रामसभा घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. विशेष ग्रामसभा घेण्याचे आदेश असतानाही अनेक ग्रामपंचायतींमध्ये त्या झाल्या नाहीत, यावरून स्थानिक प्रशासनाची उदासीनता दिसून येते. ग्रामसभांचे आयोजन झाले नसल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, याकडे लक्ष लागले आहे.

## मानवता फाउंडेशन तर्फे महिला दिन साजरा

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या मोर्शी शहरातील मानवता फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्या वतीने शहरातील जवाहर कॉलनी परिसरात 8 मार्च रोजी जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मोर्शी शहरातील गरीब व कष्टाळू आणि स्वबळावर स्वत:चा तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी परिश्रम करणाऱ्या महिलांचा संस्थेतर्फे सन्मान चिन्ह, शॉल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप इंगळे यांच्या हस्ते या महिलांचा



सत्कार झाला. बसचालक सुप्रिया वासनकर तसेच विधवा महिला प्रमिला संतोष गोरे, सुशीला गणेश लोही, शालुबाई मधुकर मेश्राम या महिलांच्या कार्याचा सन्मान यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी बंटी उर्फ महेश नागले, चंदन हुरमाळे, उज्वला टेंभुर्णे, अंकुश सरोदे, मयूर टाके, सतीश धोत्रे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

# आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने सुरू केले एमएचटी-सीईटी

## नवीन एमएचटी-सीईटीअभ्यासक्रमांची सुरूवात ही प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी तयारी करणाऱ्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याच्या आकाशच्या दृष्टीकोनाचा एक भाग आहे



**नागपूर, ०७ मार्च २०२५:** आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (एईएसएल), जी टेस्ट प्रिपरेटरी सेवांची राष्ट्रीय अग्रणी संस्था आहे, त्यांनी महाराष्ट्रातील १०वी आणि ११वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सीईटी (सामान्य प्रवेश परीक्षा) अभ्यासक्रम सुरू केले आहेत. हे अभ्यासक्रम विशेषतः अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठीच्या प्रादेशिक प्रवेश परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहेत. इंग्रजी माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या या वर्गांना बोर्ड परीक्षेनंतर सुरुवात होईल.

नवीन एमएचटी-सीईटी अभ्यासक्रम आकाशच्या प्रादेशिक बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती वाढविण्याच्या दृष्टिकोनाचा एक भाग आहे आणि राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच सीबीएसई अभ्यासक्रमासाठी दर्जेदार प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे. हा कार्यक्रम आपल्या राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक शिक्षण समाधान प्रदान करेल.

यासाठी इयत्ता ११ वीच्या स्वतंत्र बॅचेस तयार केल्या जातील आणि अध्यापनाचे माध्यम इंग्रजी असेल.

एमएचटी-सीईटीमध्ये २०२२ मध्ये ६,०६,७९० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी ४,६७,३७९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. २०२३ मध्ये ६,३६,८०४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली, त्यापैकी ५,९१,१३० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर २०२४ मध्ये ७,२५,७७५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आणि ६,७५,३७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

### या नवीन उपक्रमाच्या काही वैशिष्ट्ये

* इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र बॅचेस चालवल्या जातील.
* एमएचटी-सीईटीअभ्यासक्रमाच्या अनुषंगाने विस्तृत अभ्यासक्रम तयार केला जाईल.
* इयत्ता ११ वीच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत असलेल्या विषयांसह (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित) उच्च-स्तरीअध्ययन सामग्री पुरवली जाईल.
* आकाशद्वारे तयार केलेले अत्यंत आकर्षक परीक्षापत्र.

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडचे मुख्य शैक्षणिक आणि व्यवसाय प्रमुख, डॉ. एच. आर. राव म्हणाले, आम्ही विद्यार्थ्यांना उच्च-स्तरीय शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांसाठी सर्वसमावेशक प्रशिक्षण देण्यास कटिबद्ध आहोत. महाराष्ट्रात सीईटी अभ्यासक्रम सुरू करून, आम्ही राज्यातील इच्छुक विद्यार्थ्यांना भक्कम शैक्षणिक पाया प्रदान करण्याचा प्रयत्न करत आहोत, जेणेकरून ते एमएचटी-सीईटीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करू शकतील. आमचे उद्दीष्ट म्हणजे विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचा विकास करणे आणि त्यांना राज्यातील सर्वोत्तम अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्यास मदत करणे.

# सीआयएसएफमुळेच देशाचा विकास, सुरळीत व्यवस्थापनात देखील मोठी भूमिका: अमित शहा



थक्कोलम, ८ मार्च : केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल अर्थात सीआयएसएफमुळेच गेल्या ५६ वर्षांत देशाचा विकास, प्रगती आणि गतिशीलता सुरक्षित राहिली असून, त्यांच्या सुरळीत व्यवस्थापनातही सीआयएसएफने महत्वाची भूमिका पार पाडली आहे, असे वक्तव्य केंद्रीय गृह मंत्री आणि सहकार मंत्री तसेच भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनी केले आहे.

तामिळनाडूमधील थक्कोलम येथे सीआयएसएफच्या ५६ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित परेड सोहळ्यादरम्यान ते बोलत होते. यावेळी त्यांनी सीआयएसएफच्या कामगिरीचे कौतुक करताना सांगितले की, सीआयएसएफने देशातील विकास, प्रगती आणि वाहतुकीची सुरक्षा सुनिश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. देशातील महत्त्वाचे विमानतळे, बंदरे, उद्योग, संशोधन केंद्रे आणि इतर महत्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पाची सुरक्षा सीआयएसएफ खूप सक्षमपणे सांभाळत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या सुरक्षा व्यवस्थेत मोठे बदल करण्यात आले आहेत. गृह मंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षा यंत्रणांना अधिक सक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, अत्याधुनिक साधनसामग्रीची उपलब्धता आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणे यासारखे अनेक मोठे निर्णय घेतले गेले आहेत. या निर्णयांमुळे देशाची सुरक्षा अधिक बळकट झाली आहे.

सीआयएसएफची जबाबदारी आणि कार्यक्षेत्र सतत वाढत आहे. गृह मंत्रालयाच्या २०२३-२४ च्या अहवालानुसार, सीआयएसएफ सध्या देशभरात ६८ विमानतळे, ११४ सरकारी उद्योग आणि अनेक महत्त्वाच्या आस्थापनांच्या सुरक्षेसाठी तैनात आहे. गेल्या वर्षभरात, सीआयएसएफने विमानतळांवर ३७१ शस्त्र तस्करीची प्रकरणे यशस्वीरीत्या शोधून काढली आहेत तसेच १९१.४८१ किलो सोने आणि ७२.८७ कोटी रोख जप्त केली आहे.

# मार्च २०२५ मध्ये काय दक्षता घ्यावी?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.

मागच्या आठवड्यात आपण सविस्तर बघितले की तीन वर्षात 3 वेगवेगळे इन्कमटॅक्स कायदे कसे लागु होतील. मार्च हा आर्थिक वर्षाचा शेवटचा महिना असतो. यात पूर्ण वर्षात कमवलेल्या उत्पन्नाच्या टॅक्सची गणना करून टी.डी.एस.कपात, अॅडवान्स टॅक्स, टी.सी.एस. इत्यादी बघावे लागते.

हे सगळे करतांना आपल्याला मार्च महिन्यात काही गोष्टींची दक्षता घेणे फार आवश्यक आहे. त्या कोणत्या बाबी आहेत यावर आपण आज सविस्तर चर्चा करणार आहोत, जेनेहमी प्रमाणे सोप्या प्रश्नोत्तर रुपात राहील.

**प्रश्न :** शामरावांनी घरासाठी कर्ज घेतले होते. त्यांच्या परतफेडीचा ई.एम.आय हा 25000 प्रती माह आहेव उर्वरित 30% हे मुद्दल आहे शामरावांचे 6 महिन्यांची ई.एम.आय थकीत आहे. याचे गणनेवर काय परिणाम होतील ?

■ टॅक्सची गणना करतांना घरासाठी जे कर्ज घेतो, त्या कर्जाचा आज कलम 24 मध्ये वजा केला जातो तसेच कर्जाची मुद्दल परतफेड असेल ती कलम 80 C मध्ये वजावट मिळते आपल्या या उदाहरणात शामरावांचीई.एम.आय 25000 प्रतीमाह आहे. यात सरासरी 70% व्याज हा 30% मुद्दल आहे म्हणजेच (25000 X 12) 70% = 210,000 आज व (25000 X 12) 30% = 90,000 मुद्दल आहे जे शामरावांच्या इन्कम मधून वजावट मिळायला पाहिजे.

परंतु ही वजावट मिळण्यासाठी एक महत्वाची अट आहेती म्हणजे की ते व्याज व मुद्दल प्रत्यक्षात भरली गेली पाहिजे. येथे शामरावांचे 6 महिन्यांचे इ. एम.आय थकीत आहे. म्हणजे त्यांनी फक्त अर्ध व्याज व आर्धीच मुद्दल प्रत्यक्षात भरली आहे. म्हणून त्यांना वजावट सुद्धा अर्धीच मिळेल. म्हणजे त्यांना (25000 X 6) 70% = 105,000 व्याजात व (25000 X 6) 30% = 45,000 मुद्दल मध्ये सूट मिळेल.

यालाच सोप्याभाषेत असे म्हणता येईल की करदात्यांना जेवढा व्याज प्रत्यक्ष भरला आहे तेवढाच त्यांना वजावट म्हणून मिळेल.

याउदाहरणात शामरावांनीजुनी करप्रणाली घेतली असेल तरच वजावट मिळेलकारणनव्या करप्रणालीत ह्या वजावटी मान्य नाहीत .

**प्रश्न :** वरील उदाहरणाप्रमाणे प्रत्यक्षपैसे भरल्यास सूट मिळते अशा अजुन बाबी आहेत का ?

■ होय प्रत्यक्ष पैसे भरल्यावरच सूट मिळेल असे कलम 43इ नमुद केलेले आहे. त्यापैकी काही महत्वाच्या बाबी खालील प्रमाणे आहेत.

एल. आय.सी पॉलिसीचे पैसे प्रत्यक्ष भरल्यावरच वजावट म्हणून घेता येतील.

मुनसिपल टॅक्स हे सुद्धा प्रत्यक्ष भरल्यानंतर वजावट म्हणून मिळेल.

मालकाने बोनस डिक्लेअर केला की लगेच वजावट मिळत नाही तो कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष दिल्यानंतर व्यापाराच्याखर्चात मांडता येतो.

इन्कमटॅक्सबद्दल ची अधिकची माहिती आपण पुढील रविवारी बघणार आहोत.

■ ■ ■ ■

# वोक्हार्ट हॉस्पिटल्समध्ये महिला दिनानिमित्त आय एम फिअरलेस मोहिमेचे आयोजन

## भारतातील १८०० महिलांचा कर्मचाऱ्यांचा सहभाग



**भारत, ८ मार्च :** वोक्हार्ट हॉस्पिटल्सने दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधत ''आय एम फिअरलेस'' मोहिमेचे आयोजन केले. मुंबई सेंट्रल, मीरा रोड, राजकोट आणि नागपूर येथील विविध शाखांमधील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. रहिवासी डॉक्टर, डॉक्टर, परिचारिका, प्रशासकीय कर्मचारी, सफाई कर्मचारी आणि इतर विभागांचे सहकारी मिळून तब्बल १८०० महिला कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला. महिलांच्या आरोग्यासंदर्भात जागरूकता वाढवणे, त्यांच्या प्रतिभेला वाव देणे आणि संस्थेमध्ये एकजूट व सहकार्याची भावना निर्माण करणे हा या मोहिमेमागील उद्देश होता.

कार्यक्रमात नामवंत वैद्यकीय तज्ज्ञ तसेच स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञांनी महिलांच्या आरोग्यावर मार्गदर्शन केले. महिलांच्या पुनरुत्पादनक्षम आरोग्याविषयी सामान्य समस्या, दैनंदिन स्व:आरोग्य मूल्यांकनाचे महत्त्व, तसेच लवकर निदानाद्वारे गंभीर आजार टाळण्याचे फायदे यावर त्यांनी मार्गदर्शन केले. व्याख्यानांनंतर डॉक्टरांसोबत संवाद व प्रश्नोत्तर सत्र आयोजित करण्यात आले, ज्यामुळे सहभागींसाठी हा अनुभव अधिक माहितीपूर्ण आणि उपयुक्त ठरला.

महिला दिनाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी केक कटिंग, मनोरंजक खेळ आणि एकत्रीकरणाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला.

महिला आरोग्यासाठी प्रतिबद्धतेचा एक भाग म्हणून, वोक्हार्ट हॉस्पिटल्सने ८ मार्च ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत पॅप स्मीयर टेस्ट, मॅमोग्राफी आणि डॉक्टर कन्सल्टेशनवर २५% सूट दिली.

# विमेन्स कॉलेजमध्ये जागतिक महिला दिवस साजरा



**नागपूर, ०८ मार्च २०२५:** विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, नंदनवन, नागपूर येथे जागतिक महिला दिवसाच्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना आणि रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महिलांमध्ये कॅन्सर बद्दल जनजागृती व्हावी या अनुषंगाने दळवी हॉस्पिटल येथील गायनोलॉजिस्ट डॉ. चित्रा फेरवानी यांनी सर्वाइकल कॅन्सर विषयी मार्गदर्शन केले. त्यांनी सर्वाइकल कॅन्सर कसा होतो ? त्याकरिता कोणती काळजी घ्यावी ? आणि उपाययोजना कशी करावी ? त्याकरिता एक वॅक्सिंन सुद्धा उपलब्ध आहे याविषयी मार्गदर्शन फेरवानी मॅडम यांनी केले. तसेच सर्वाइकल कॅन्सर विषयी माहिती पुस्तिका सर्वांना देण्यात आली. तसेच रक्त तपासणी आहे ब्रेस्ट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्याकरिता इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मेयो येथून अश्विनी सराटकर आणि साक्षी गोडबोले (ब्रेस्ट एक्झामिनर) उपस्थित होत्या. या रक्त तपासणीत रक्तगट आणि सिकलसेल तपासण्याकरिता रक्ताचे नमुने घेण्यात आले. तसेच जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने संविधाना संबंधी निबंध तसेच प्रश्नमंजुषा स्पर्धेचे पुरस्कार वितरण सुद्धा करण्यात आले. विजेत्यांना प्रमाणपत्र, रोख रक्कम आणि संविधान ग्रंथ देण्यात आले. जागतिक महिला दिनानिमित्त या दोन्ही कार्यक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाला वैदर्भीय संस्थेच्या अध्यक्षा सौ. सावित्री रोकडे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद गुल्हाने यांनी सर्वांना जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या.

# दृष्टी कम्युनिकेशन्स येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**नागपूर, ०८ मार्च २०२५:** आज जगात सर्व क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत. चूल व मूल या संकल्पनेत स्वतःला गुंतवून न घेता पत्रकारिता, विज्ञान, कला, संस्कृती, सिने नाट्य, संशोधन, नेतृत्व , खेळाडू अशा कितीतरी क्षेत्रात तिने आपली चुणूक दाखवून एक वेगळी ओळख जगासमोर ठेवली आहे. यशाच्या या उत्तुंग भरारीसोबतच तिने परिवार घडवला आहे. आज कुटुंब व्यवस्थेत स्त्री चे महत्व अनन्यसाधारण आहे. आज ८ मार्च, जागतिक महिला दिवस आहे. त्यानिमित्त नागपुरातील अग्रगण्य मिडिया एजन्सी दृष्टी कम्युनिकेशन्स तर्फे महिलांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू व मिठाई देऊन सत्कार करण्यात आला. दृष्टी कम्युनिकेशन्स चे संचालक संजय चिंचोले यांनी श्रीमती सविता चिंचोले, सौ. सुरेखा चिंचोले, सौ. वैशाली वैद्य, वृषाली येडस्कर, सौ प्रगती जोशी, पूजा घाटे त्याचप्रमाणे ऑफिसकाम व घरकाम करणाऱ्या श्रीमती शोभा अवसरे, रिता बक्सरे, अनुताई, सिंधुताई यांचे सुद्धा महिला दिनानिमित्त अभिनंदन केले. यावेळी संजय चिंचोले यांनी महिलांच्या कार्याकर्तुत्वाचे भरभरून कौतुक केले. अश्यारितीने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

# कॅस्ट्रॉल इंडियाची शाहरूख सोबत नवीन मोहिम

## नवीन कॅस्ट्रॉल ॲक्टिव्ह 3X प्रोटेक्शनला नव्या उंचीवर नेले




मुंबई, ८ मार्च २०२५: कॅस्ट्रॉल इंडिया या देशातील आघाडीच्या ल्युब्रिकण्ट उत्पादक कंपनीने आपला प्रमुख दुचाकी इंजिन ऑईल ब्रँड कॅस्ट्रॉल ॲक्टिव्हच्या रिलाँचला पाठिंबा देण्यासाठी उच्च-प्रभावी विपणन मोहिम लाँच केली आहे. इंजिनला जास्त गरम होण्यापासून उच्च दर्जाचे 3X प्रोटेक्शन देण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या उत्पादन अपग्रेडला मल्टी-चॅनेलमोहिमेचे पाठबळ आहे, ज्यामध्ये ब्रँड अॅम्बेसेडर शाहरूख खान आहेत.

ओगील्व्ही इंडियाने संकल्पना मांडलेली ही मोहिम क्रिएटिव्ह हुक म्हणून भारतातील उन्हाळ्यामधील उष्ण तापमानाला प्रकाशझोतात आणते, तसेच उच्च अॅड्रेनालाइन चेस सीक्वेन्सच्या माध्यमातून या उष्ण तापमानामध्ये देखील कॅस्ट्रॉल ॲक्टिव्हची स्थिरता दाखवते. राजस्थानमधील उष्ण वाळवंटात शूटिंग करण्यात आलेल्या टीव्हीसीमध्ये एसआरकेने गुन्हेगारांचा पाठलाग करणाऱ्या पोलिसाची भूमिका साकारली आहे. हा पाठलाग अधिक तीव्र होत असताना कॅस्ट्रॉल ॲक्टिव्हची शक्ती असलेली त्यांची बाइक प्रखर उष्णतेवर मात करते, तर सामान्य इंजिन ऑईलची शक्ती असलेली गुन्हेगारांची बाइक जास्त गरम होते आणि थांबते.

''कॅस्ट्रॉल ॲक्टिव्हची गाथा साधी, पण शक्तिशाली आहे, ती म्हणजे प्रखर स्थितींमध्ये संरक्षण. या गाथेला सादर करण्यासाठी शाहरूख खान यांच्याहून उत्तम कोणीच नाही. त्यांची पडद्यावरील उपस्थिती, तसेच उत्पादनाचे प्रबळ वचन प्रभावी कथानक तयार करतात,'' असे ओगील्व्ही इंडियाचे चीफ क्रिएटिव्ह ऑफिसर सुकेश नायक म्हणाले.''

# राशी भविष्य

**मेष :** नोकरीत अधीनस्थ आणि वरिष्ठांशी चांगला समन्वय राहील. व्यवसायात नवीन सहयोगी मिळतील. आज आर्थिक बाजू मजबूत करण्यासाठी अतिरिक्त प्रयत्न करावे लागतील.

**वृषभ :** आज कौटुंबिक बाबतीत काही महत्त्वाचे निर्णय घेतले जातील. जे तुमच्या मनाला शांतता देईल. नियोजनबद्ध पद्धतीने अभ्यासात व्यस्त राहून विद्यार्थ्यांना फायदा होईल.

**मिथुन :** व्यावसायिक क्षेत्रात काम कार्यरत लोकांना अचानक लाभ होण्याची शक्यता आहे. राजकीय क्षेत्रात लोकांना महत्त्वाची पदे मिळू शकतात.

**कर्क :** आज तुम्हाला व्यवसायात असे यश मिळेल ज्याची तुम्ही कल्पनाही केली नसेल. बेरोजगारांना रोजगार मिळेल.

**सिंह :** तुम्हाला एखादी चांगली बातमी मिळेल. घर घेण्याची इच्छा पूर्ण होऊ शकते. समाजात मान-सन्मान वाढेल. प्रतिष्ठित लोकांशी संपर्क साधला जाईल.

**कन्या :** जमीन, इमारत, वाहन इत्यादी खरेदी करण्याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. व्यवसायात वर्तन संतुलित ठेवा. अन्यथा आर्थिक नुकसान आणि बदनामी होऊ शकते.

**तूळ :** प्रेमसंबंधांमध्ये परिस्थिती फारशी चांगली राहणार नाही. आज आरोग्य सर्वसाधारणपणे चांगले राहील. शारीरिक ताकद आणि मनोबल वाढेल. आजारांपासून सावध राहा.

**वृश्चिक :** भांडवली गुंतवणूक वगैरे विचारपूर्वक करा. घाई टाळा. शेअर्स, लॉटरी, ब्रोकरेजमधून पैसे मिळण्याचे संकेत आहेत.


**धनु :** आज अविवाहित लोकांना त्यांच्या आवडीचा जोडीदार मिळू शकतो. ज्यामुळे तुमची कोणतीही इच्छा पूर्ण होऊ शकते. मनोबल वाढवण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** तुम्हाला आधीपासून असलेल्या कोणत्याही आजारापासून आराम मिळेल. हवामानाशी संबंधित आजार झाल्यास त्वरित उपचार घ्या. ताप येणे, खोकला, अंगदुखी यांसारख्या समस्या उद्भवतील.

**कुंभ :** आज आरोग्याशी संबंधित कोणतीही गंभीर समस्या येण्याची शक्यता कमी आहे. तुम्हाला आधीपासून असलेल्या कोणत्याही आजारापासून आराम मिळेल.

**मीन :** रुग्णालयात दाखल झालेल्या लोकांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिला जाईल. ऑपरेशन इत्यादी बाबतीत तुमचे ऑपरेशन यशस्वी होईल

# शब्दकोडे क्रमांक २०५५



**आडवे शब्द :-**
१) घरातील शत्रू
७) हिंदुस्थान
९) लबाडीचा हेतू
११) कुंड्यांना लावण्याचा रंग
१२) जाडसर पीठ
१३) राजाचा कालावधी
१५) त्वरित
१७) साखरेचा रस
१८) गोमाता
१९) आवाज, नाद
२०) बाजेची कापडी पट्टी
२१) हाणामारी
२४) राजाची कचेरी
२६) च्या प्रमाणे
२७) पवन
२८) मान खाली घातलेला
३०) तेव्हा(हिं)
३१) वकीलांची बसण्याची जागा
३२) हाण, ठोक
३४) सातूचे पीक
३५) भिंतीवर सरपटणारा प्राणी
३६) हाताचा तळवा
३८) घराचा मागचा दरवाजा
४०) निकट
४३) वसन
४४) दारूचा एक प्रकार
४६) वाद्य वाजविण्याची कला
४७) छोटी घागर
४८) सोन्या चांदीचा व्यापारी
५०) विहीर
५१) रात्रीचा पाऊस
५३) तत्काळ, लगेच
५६) वस्ती
५९) एक ज्वालाग्रही पदार्थ
६०) व्यापारात जम बसविलेली एक जमात
६२) प्रतिलेख, नक्कल
६३) इंद्रिय, घटक
६५) घोडा
६६) एक पौराणिक प्रेमिकांची जोडी
६८) पाण्याचे मृत्तिका पात्र
६९) नट्टापट्टा करणारा
७१) मीठ
७३) नारळाच्या आंत वाढलेला कोंब
७५) पुष्कळ
७६) राखण्याची मजुरी
७७) बारीक मऊ केस
७८) छाती,
७९) इच्छा
८०) खेद, दु:ख

**उभे शब्द :-**
१) दुष्काळ (हिं.)
२) च्या साठी
३) धनुष्यबाण
४) सत्ता
५) नमकीन
६) शासकीय
७) स्तुती करणारा
८) समशेर
९) कावळा
१०) नियमित यात्रा करणारा
१४) आशीर्वाद देणारा गणपती
१६) नवरदेव
१७) पारद
२०) मुस्लीम सरदार
२१) चणचण
२२) पद्धतीप्रमाणे
२३) माजलेला
२५) अर्धा शेर
२६) पुन्हा पुन्हा
२९) अभिप्राय
३१) छोटा, लहान
३३) प्रज्वलित, तापलेले
३५) गवताचे पान
३७) रेशीमाची गुंडाळी
३८) घागरा
३९) किंमत, पैसा
४१) हत्ती
४२) जमिनीखाली येणारे फळ
४५) उंच मानेचा एक प्राणी
४६) पूर्वज
४८) प्रभात
४९) सभा जिंकणे, (वा.प्र.)
५१) रात्र
५२) वास लावलेले
५४) बेडकाचे ओरडणे
५५) पोपट
५७) अन्यायाचे, बेशिस्त
५८) किंमत, निष्ठा
६१) उणीव, दुर्भिक्ष
६२) वाट पाहाणे
६३) किमती, बहुमोल
६४) कालपुरुष
६७) रुग्णालय
७०) रोखलेली नजर
७२) प्रजा
७४) ग्राम, नगर
७६) सीतापती

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| था | ल | त्या | गा | डी | ला | खी | ळ | घा | ल | णे | | | क | था |
| क | व | | भ | | ज | र | | व | क्ष | | स | शे | द | |
| र | | म | ण | का | | | व | न | भो | ज | न | | र | सा |
| धु | का | र | | ज | वा | ही | र | | ज | न | स | मु | दा | य |
| क | ळ | वा | क | ळ | व | | वं | द | न | | ना | | न | |
| र | | | ड | | र | क | टा | | | पा | टी | ल | | न |
| | ज | ना | व | र | | स | | स | म | र्थ | | ह | ज | र |
| म | हा | | ट | ण | त्का | र | | म | हा | सा | ग | र | | सं |
| न | ल | द | | बा | | त | ग | | द्वा | र | | | च | हा |
| मा | | शा | | व | पा | | म | हा | र | थी | | क | ल | र |
| ड | रा | व | ड | रा | व | | न | र | | | स | मा | न | |
| | स | ता | र | | न | फा | | जी | व | न | दा | न | | क |
| प | | र | का | ना | | र | ज | त | | शा | | दा | भ | ण |
| व | सा | | ळी | | सा | क | व | | भा | | घ | र | | ख |
| न | व | ल | | वा | | त | न | म | न | ध | न | | ता | र |

# स्टोन क्रशर कंपनीच्या व्यवस्थापकाला चाकूचा धाक दाखवून लुटले

## 3 लाखांचा ऐवज लंपास ● दुचाकीवरून आले होते अज्ञात दरोडेखोर ● दिवसाढवळ्या घटना

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,( दि.9 )**- स्टोन क्रशरच्या व्यवस्थापकाला चाकूचा धाक दाखवून अज्ञात दरोडेखोरांनी 3 लाख रुपयांचा ऐवज लंपास केला. दरोडेखोरांनी व्यवस्थापकाची दुचाकी आणि दोन स्मार्टफोनही हिसकावून घेतले. ही घटना रविवारी (दि. 9) सकाळी 8 वाजता रामगावजवळ घडली, त्यामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण आहे. दत्तापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून गुन्हे शाखेसह पोलिस दरोडेखोरांचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, जुना धामणगाव येथील श्री स्वामी समर्थ नगर येथील रहिवासी नीलेश शेषराव चाफले (45) हे गेल्या पाच वर्षांपासून साई स्टोन क्रशरमध्ये दिवाणजी (व्यवस्थापक) म्हणून काम पाहतात. रविवारी सकाळी 7ः45 वाजता ते कामगारांच्या वेतनासाठी 2 लाख 88 हजार रुपये, खात्यांचे चार रजिस्टर आणि इतर



कागदपत्रे भरलेली बॅग घेऊन त्याच्या दुचाकीवरून (एमएच-27 एझेड 8030) रामगावला निघाले. सकाळी 8 वाजताच्या सुमारास, जेव्हा ते रामगाव रोडवरील बाळासाहेब तुपसुंदरे यांच्या शेताजवळ पोहोचले तेव्हा काळ्या मोटारसायकलवरून (पेन्शन प्रो मॉडेल) दोन अज्ञात व्यक्ती त्यांचा पाठलाग करत तेथे आले. त्यांनी अचानक त्याची दुचाकी अडवली. यातील एक जण खाली आला आणि चाकू दाखवून धमकावू लागला. यानंतर, दरोडेखोरांनी हिरव्या रंगाच्या कापडी पिशवीत ठेवलेले 2 लाख 88 हजार रुपये, रजिस्टरची बॅग आणि दोन मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावून घेतले आणि दिवाणजींना जमिनीवर ढकलले.

**आरडाओरडा केल्याने पळाले**

आरडाओरडा ऐकून जवळच्या शेतात काम करणारा राहुल गौतम बनसोड (रामगाव) तिथे धावला. दरम्यान, दरोडेखोर केवळ त्यांची दुचाकीच घेऊन गेले नाहीत तर दिवाणजींची दुचाकीही घेऊन पळून गेले. त्यानंतर काही वेळातच चाफले आणि बनसोड यांनी त्यांचा पाठलाग केला, परंतु दरोडेखोरांनी चाफले यांची दुचाकी रामगाव-धामणगाव रोडवरील स्मशानभूमीजवळ फेकून दिली आणि त्यांच्या दुचाकीवरून धामणगाव रेल्वे स्थानकाच्या दिशेने पळून गेले.

दरोडेखोरांनी 2 लाख 88 हजार रुपयांची रोकड, 14 हजार रुपयांचे दोन स्मार्टफोन आणि दिवाणजींची मोटारसायकल (जी नंतर सापडली), एकूण 3 लाख 2 हजार रुपयांचा माल पळवून नेला. महिमापूर गावाजवळील उर्ध्व वर्धा कालव्याच्या काठावर दरोडेखोरांनी चाफले यांचा मोबाईल फेकून दिला होता. तांत्रिक मदतीने पोलिसांनी मोबाईलचे लोकेशन ट्रॅक केले आणि ते परत मिळवले. पहिला दरोडेखोर वय 35-40 वर्षे, राखाडी पूर्ण बाह्यांचा शर्ट आणि निळा जीन्स घातलेला. दुसरा दरोडेखोर वय 35-40 वर्षे, तपकिरी चेकर पूर्ण बाह्यांचा शर्ट आणि फिकट निळा जीन्स घातलेला. या घटनेबाबत दत्तापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक गिरीश ताथोड यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू आहे आणि गुन्हे शाखेचे पथक दरोडेखोरांचा शोध घेत आहे.

### ग्रामीण पोलिसांसमोर दुसरे आव्हान



18 नोव्हेंबर 2024 रोजी भाजपाचे तत्कालीन उमेदवार प्रताप अडसड यांची बहीण अर्चना रोठे या मतदार संघात प्रचार करून परतत असतांना मतदार संघातील सातेफळ फाट्यावर अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर अचानक हल्ला केला होता. त्या हल्ल्यात अर्चना रोठे यांच्या हाताला गंभीर घाव झाले होते. त्यांची गाडी क्रमांक एम.एच. 27 डी.बी. 5001 याचे समोरील काच फोडण्याचाही प्रयत्न यावेळी झाला होता. ही घटना लुटमारीच्या प्रकारातून झाली असल्याचे सांगितल्या जात होते. मात्र यातील आरोपी चांदूर रेल्वे पोलीसांना अद्याप मिळाले नाही. आता पुन्हा लुटमारीच्या एका घटनेमूळे दत्तापूर पोलिसांसमक्ष आव्हान उभे ठाकले आहे.

# एसटी वाहकाला मारहाण; गुन्हा दाखल

## वाठोडा बस स्टॉपवरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि. 9)** - महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वाहकाला मारहाण करण्यात आली. येथून जवळच असलेल्या चांदस वाठोडा बसस्थानक परिसरात सदर घटना शनिवारी (दि. 7) घडली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हा राज्य परिवहन महामंडळ वरुड आगारा येथे एसटी बस चालक/वाहक आहे. वरुड आगाराची एम.एच.40 वाय 5851 क्रमांकाची बस रोजच्या प्रमाणे नागपुर येथून परत वरुडला येत होती. दरम्यान जलालखेडा येथील आरोपी हा आई-वडीलांसह वाठोडा बस स्टॉपवर उतरला. यावेळी आरोपीने फिर्यादीशी वाद घालत, तू खुप माजला आहे, माझे आई-वडील खाली पडले, असे म्हणत आरोपी हा फिर्यादीशी झटापट करून नाका, तोंडावर, थापडा बुक्कांनी मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या गळ्यात असलेला दुपटटा ओढत काठी घेऊन फिर्यादीच्या अंगावर मारण्यास आला. तसेच अश्लिल शिवीगाळ करीत जिवाने मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी फिर्यादी उज्वल रामदास गायकवाड (37), रा.सहकारी बॅक कॉलनी, मुर्तिजापूर यांच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अरोपी हरीश पाडुंरग बोबडे (55), रा.चांदस वाठोडा, ता.वरुड याचेविरुद्ध भादंवि 132, 121 (1), 296, 351 (2), 352 (3), न्या.सं.2023 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात वरुड पोलिस करीत आहे.

## तरुणीची आत्महत्या, गुन्हा दाखल

**अमरावती** - एका तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याप्रकरणात दर्यापूर पोलिसांनी 6 मार्च रोजी एका तरुणाविरुध्द आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. निखील रमेश वाडी (23, रा. मलीयेपुरा, दर्यापूर) असे आरोपीचे नाव आहे. आरोपीने तरुणीच्या घरी इलेक्ट्रीकलचे काम केले होते. त्यानंतर तो तिला त्रास देऊ लागला. त्याच्या त्रासापाई अखेर तरुणीने आत्महत्या केली. या घटनेनंतर तरुणीच्या कुटुंबीयांनी दर्यापूर पोलिसात तक्रार दिली.

# तीन झोपड्या जळून खाक

## अचलपूरच्या अंजनगाव स्टॉपवरील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9)** गुरुवारी मध्यरात्री 1.30 वाजताच्या सुमारास अचलपूर येथील अंजनगाव स्टॉप स्थित मोंगा झोपडपट्टीत भीषण आग लागल्याने तीन झोपड्या जळून खाक झाल्या. या घटनेमुळे मध्यरात्री प्रचंड खळबळ उडाली होती.

या आगीत फूटपाथवर राहणारे काही लोक बेघर झाले. रात्रीच्या वेळी ही आग कशामुळे लागली हे अद्याप स्पष्ट झाले नाही. परंतु आगीमुळे झोपडपट्टीवासीयांना रस्त्यावर राहावे लागले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजेश बेलसरे, लंगडा बेलसरे, तुलसी मुन्ना जांबेकर यांची घरे पूर्णपणे जळून खाक झाली. झोपड्यांवरून जाणाऱ्या विजेच्या तारा तीन फूट अंतरावर असल्याने ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ही आग स्पार्किंगमुळे लागली नाही. एखाद्या अज्ञात व्यक्तीने बिडी किंवा सिगारेट ओढल्याने लागलेल्या ठिणगीमुळे आग लागल्याची शक्यता नाकारता येत नाही.

## विवाहितेचा शारिरिक व मानसिक छळ

**अमरावती** - माहेरवरून 1 लाख रुपये आणण्याचा तगादा लावून एका विवाहितेचा शारिरिक व मानसिक छळ करण्यात आला. पिडित महिलेने या घटनेची तक्रार 6 मार्च रोजी मोर्शी पोलिसात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी अभिलाश प्रभाकर वानखडे (30), प्रभाकर वानखडे, एक महिला (तिन्ही रा. लोणी) व एका अन्य महिलेविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# आरोग्य सुविधा पुरविल्यानंतरही दगावली ती माता- आरोग्य विभाग

## कसाईखेडा येथील माता मृत्यू प्रकरण

**महासाग प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9)** - कसाईखेडा, (ता. धारणी) येथील गरोदर महिलेला आरोग्य विभागामार्फत संपूर्ण मदत करण्यात आली. तसेच उपचार पुरविण्यात आले आहे. गरोदर मातेला वैरागड प्राथमिक आरोग्य केंद्रात आणल्यानंतर आरोग्य पथक उपस्थित होते. त्यांनीच गरोदर महिलेवर उपचार करून तिला पुढील उपचारासाठी धारणी येथे पाठविले असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

मधू शंकर जावरकर, वय 22 वर्ष, रा. कसाईखेडा या गरोदर मातेच्या कुटुंबियांनी दि. 3 मार्च रोजी रात्री 10.30 ते 11 वाजताच्या सुमारास मळमळ, कफ आणि मातेला श्वास घेण्यास त्रास होत असल्याचे आशा सेविका निता मुरले यांना सांगितले.

त्यानंतर त्यांनी रुग्णवाहिका बोलावून रात्रीच वैरागड प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. यावेळी डॉ. प्रज्ञा वाकोडे आणि डॉ. भगत उपस्थित होते. डॉ. प्रज्ञा वाकोडे यांनी मातेची तपासणी केली असता मातेचा रक्तदाब वाढलेला होता व छातीत दुखत होते. तसेच मळमळ व कफचा त्रास होत होता. लक्षणानुसार डॉक्टरांनी उपचार करून तिला धारणी उपजिल्हा रुग्णालय येथे संदर्भित करण्यात आले. मात्र धारणी येथे जात असताना मातेची प्रकृती चिंताजनक झाल्याने मृत्यू झाला. धारणी येथे मातेच्या पार्थिवाचे शवविच्छेदन करून व्हिसरा तपासणीकरीता पाठविण्यात आला आहे.

मेळघाटमध्ये माता आणि बालमृत्यू रोखण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात येत आहे. मधु शंकर जावरकर ही माता अतिजोखमीची असूनही तिचा मृत्यू होऊ नये, यासाठी आरोग्य विभागाने अथक प्रयत्न केले. संपूर्ण गरोदरकाळात सदर मातेला संपूर्ण आरोग्य सेवा देण्यात आली आहे. मात्र तरीही ती दगावले असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.

# शिवकावड यात्रेत लक्षवेधक ठरली महाकाल झाकी

## सिद्धेश्वर संस्थानतर्फे पहिल्यांदाच आयोजन





**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि. 9)** तालुक्यातील खेड येथील सिद्धेश्वर संस्थानतर्फे आयोजित शिवकावड यात्रेने खेड नगरी अक्षरशः भक्तिरसात न्हाऊन निघाली. या कावड यात्रेमध्ये परिसरातील हजारो नागरिक सहभागी झाले होते. शिवलिंग, महाकाल दर्शन, डमरूधारी भोलेबाबा, महाबली हनुमान, श्री गणेश, नंदी अशा एकाहून एक स्वतंत्र कावड संस्थानतर्फे काढण्यात आल्या.

कुंभारपुरा येथून काढण्यात आलेल्या शिव कावड यात्रेचे विसर्जन सिद्धेश्वर संस्थान पेठ येथे करण्यात आले. या दरम्यान या शोभायात्रेचे गावातील मुख्य चौकामध्ये वेगवेगळ्या धार्मिक, सामाजिक मंडळांच्या वतीने स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी जलपानची व्यवस्थाही करण्यात आली होती. शिव कावड यात्रेच्या यशस्वीतेसाठी समस्त गावकरी मंडळी, महिला, भगिनी, तरुणांनी सहकार्य केल्याबद्दल सिद्धेश्वर संस्थानतर्फे सर्वांचे आभार मानण्यात आले.

मोर्शी वनविभागाने केलेल्या सहकार्याबद्दल देखील मंडळाचे विश्वस्तांनी आभार मानले. मंडळाचे विश्वास डाखोरे, दिलीप हीवे, दिलीप कुमरे, सतीश बक्कार, रामदास मेंढे, नीलेश सुर्यकार, प्रमोद खडसे, अनिल मेंढे, गोपाळ राऊत, धनराज जूमडे, नामदेव बेहरे, नामदेव डाखोरे, मोहन हिवे, श्रीकृष्ण राजस, अंकुश भाकरे, गजानन कडू, दर्शन भाकरे व रामराज्य क्रीडा मंडळ, शिवतीर्थ प्रतिष्ठान यांनी शिवकावड यात्रेच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.





# चांदूर बाजार येथे जन औषधी दिन साजरा

## स्थानिक केंद्रात आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूरबाजार, (दि. 9)**- चांदूरबाजार येथील भक्तिधाम मार्गावर असलेल्या शिक्षक कॉलनी स्थित प्रधानमंत्री भारतीय जन औषधी केंद्रावर 11 वा जन औषधी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. बोंडे यांनी जन औषधी केंद्राच्या संचालिका कांता चौधरी यांना शुभेच्छा दिल्या.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने या स्वस्त दरातील औषधींच्या योजनेबाबत जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि जेनेरिक औषधांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी 7 मार्च हा दिवस %%जन औषधी दिवस%% म्हणून साजरा केला जातो. गेल्या 11 वर्षात 768 जिल्ह्यात 15 हजारांवर जन औषधी केंद्र सुरू झाली आहेत. या केंद्रांवर 2 हजार 47 प्रकारच्या औषधी व 300 सर्जिकल उत्पादने 50 ते 90 टक्के कमी दराने विक्री करता उपलब्ध असतात, अशी माहिती यावेळी बोलताना भाजप नेते गोपाल तीरमारे यांनी दिली. यावेळी बोलताना डॉ. अनिल बोंडे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांच्या पुढाकाराने संपूर्ण देशात जन औषधी परियोजना राबविण्यात येत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या औषधीवरचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. कांता चौधरी यांनी चांदूर बाजारामध्ये पहिले जन औषधी केंद्र सुरू केले असून त्याचा गोरगरीब रुग्णांना मोठा लाभ मिळत आहे. सर्व नागरिकांनी या योजनेचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन डॉ. बोंडे यांनी यावेळी केले. कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्य जन औषधी नोडल अधिकारी शिवम पाटील, संचालिका कांता चौधरी, पायल चौधरी, नगरसेविका मीरा खडसे, नगरसेवक आनंद अहिर, विजय विल्हेकर, ब्रिजमोहन हरकुट, रावसाहेब गुलक्षे, प्रफुल्ल महाजन, रमेश तायवाडे, राजू तंतरपाळे, गजानन राऊत, शुभम किटुकले, सचिन तायवाडे, सुरज डोंगरे, शुभम पांडे, तेजस आजनकर, गजानन महाराज मंदिर ट्रस्टचे प्रफुल्ल चौधरी, आशिष अवतकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# बाजारात नवा गहू दाखल

## आणखी गव्हाची आवक वाढणार | वार्षिक धान्य खरेदीसाठी नागरिकांची लगबग



**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट, (दि. 9)** - जिल्ह्यात सध्या रब्बी हंगामातील गहू काढणीला वेग येत आहे. मागील आठवडाभरापासून बाजारात नवा गहू दाखल होत असून, गव्हाला सरासरी 3 हजार 500 ते चार हजार रुपये प्रतिक्विंटलचा भाव मिळत आहेत.पुढील काळात आणखी गव्हाची आवक वाढणार आहे. त्यामुळे गव्हाचे भाव उतणार की वाढणार, याकडे आता लक्ष लागले आहे.

नोकरदार असो की सर्वसामान्य बाजारात नवा गहू दाखल झाल्यावर चार ते सहा महिने पुरेल एवढा गहू, ज्वारी खरेदी करून ठेवतात. आवक वाढत असल्याने गव्हाच्या भावात पुढील काही दिवसात घट झाल्याचे दिसू शकते. वार्षिक धान्य खरेदीसाठी नागरिकांची लगबग नवा गहू बाजारात दाखल झाल्यामुळे खरेदीसाठी नागरिक गर्दी करीत आहेत. सध्या गव्हाला चांगला भाव असल्याने शेतकरी नवा गहू आणत आहेत.

**लोकल गहू खाण्यासाठी चवदार**

जिल्ह्यात लोकल गव्हासह लोकवन गव्हाला चांगली मागणी आहे. हा गहू खाण्यासाठी चवदार असल्याने नागरिक या गव्हाची अधिक मागणी करताना दिसत आहेत.

पोषक वातावरणामुळे गव्हाचे पीक यंदा जोमदार यावर्षी रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात गव्हाची पेरणी झाली होती. गव्हाला वातावरणही योग्य असल्याने गव्हाचे पीक चांगले बहरले होते. त्यामुळे यंदा गहू उत्पादक शेतकऱ्यांना चांगले उत्पादन झाले. त्यांना फायदा होत आहे. बाजारपेठेत गव्हाचे सध्याचे दर काय? मार्केट यार्डमध्ये लोकलसह महाकाल, लोकवन गव्हाला चांगला भाव मिळत आहे. लोकवन, महाकाल गहू प्रतिक्विंटल तीन हजार 500 ते 4 हजार रुपये दराने विक्री होत आहे. याशिवाय लोकल गव्हालादेखील बाजारात मागणी असून, चांगला भावदेखील मिळत आहे. त्यामुळे शेतकरी आनंदी आहेत.

### गहू साठविताना काय काळजी घ्याल ?

गव्हाची दीर्घकाळ साठवणूक करण्यासाठी गव्हात कडू लिंबाची पाने शेतकरी टाकून ठेवतात. तसेच गव्हाला कोरड्या जागेवर त्याची साठवणूक केली जाते. कीड लागणार नाही, यासाठी बाजारात पावडर मिळते. त्याचादेखील अनेक शेतकरी उपयोग करताना दिसून येत आहेत.

# गावठी दारू बनवणाऱ्या अड्डयावर छापा



## गौरखेडा येथे पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे( दि.9 )** - चांदुर रेल्वे तालुक्यातील गौरखेडा या गावात अवैधपणे गावठी दारू अड्डयावर धाड टाकून पोलिसांनी गावठी दारू व ती बनवण्याकरिता वापरण्यात येत असलेले साहित्य जप्त करुन ते नष्ट करण्यात आले.

गौरखेडा येथे अवैधरीत्या मोठ्या प्रमाणात गावठी दारुची निर्मिती केली जात असल्याची माहिती चांदुर रेल्वे पोलिसांना मिळाली होती. त्यावरुन पोलिसांनी गौरखेड्यात धडक देवून हा अड्डा गाठला. तेथे आरोपी महिला तिच्या घराच्या मागच्या बाजूला अवैधपणे गावठी दारू बनवून विक्री करत असल्याचे दिसून आले.

रविवार सकाळी या अड्डयावर छापा मारण्यात आला. तेथील 8 प्लास्टिक ड्रम, मोहाचा सडवा, तीन प्लास्टिक डबक्या यामध्ये 90 लिटर दारू व गावठी दारू बनवण्याकरिता वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण 1 लाख 31 हजार 100 रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पोलिसांनी तो पंचासमक्ष नष्ट केला. ही कारवाई पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या नेतृत्वात पीएसआय नंदलाल लिंगोट, अतुल शिरभाते, सागर पाचपोर, सैनिक गौरव यांनी केली.

# पतंजली प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



## पतंजली प्रकल्पामुळे रोजगार व संत्र्याला बाजारपेठ : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

पतंजलीच्या मिहान स्थित फुड आणि हर्बल प्रकल्पासाठी दिवसाला जवळपास ८०० टन संत्र्यांची आवश्यकता लागणार आहे. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला आपसुकच बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होणार असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यावेळी म्हणाले. या प्रकल्पास शेतकऱ्याचे पूर्ण सहकार्य लाभेल व निंबुवर्गीय फळांचा पुरवठाही करण्यात येईल. या प्रकल्पाद्वारे शेतकरी समृद्ध होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले. उत्तम संत्रा बीज आणि कलम निर्मितीसाठी आधुनिक नर्सरी उभारण्याची मागणी त्यांनी यावेळी राज्य शासनाकडे केली.



पतंजली फुड व हर्बल पार्कचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

पतंजली फुड व हर्बल पार्कच्या माध्यमातून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालावर प्रक्रिया करून तो बाजारपेठेत जाणार आहे. संत्र्याची ग्रेडींग, साठवणही येथे होणार असून हा प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. या प्रकल्पास राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असून पतंजली व राज्यशासन संयुक्तपणे सर्व सोयींनी सज्ज नर्सरी येथे उभारणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

येथील मिहान परिसरात स्थित पतंजली फुड आणि हर्बल पार्कचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते. योगगुरु स्वामी रामदेव बाबा, पतंजली आयुर्वेद लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जलस्वाल, आमदार सर्वश्री डॉ. आशिष देशमुख, समीर मेघे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ९ वर्षांपूर्वी मिहानमध्ये पतंजलीने पाया रचला. त्यानंतर बऱ्याच अडचणी आल्या तरीही नडगमगता त्यांनी हा प्रकल्प पुर्णत्वास नेला. पतंजली उद्योग समुहाला नागपुरात मिहानमध्ये आमंत्रित केले. त्याचवेळी विविध राज्यातून या समुहाला त्या-त्या राज्यांमध्ये उद्योग उभारण्यास बोलावण्यात येऊ लागले. मात्र मिहानमध्येच हा प्रकल्प उभारण्याचा संकल्प घेऊन व राज्यशासनाच्या रितसर निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन आज हा प्रकल्प उभा राहिला. या प्रकल्पासाठी आवश्यक माल संत्रा उत्पादक शेतकऱ्यांकडून पुरविला जाईल. यामुळे शेतकऱ्यांचा मालही विकला जाईल. या प्रकल्पात संत्र्यावर प्रक्रिया केली जाईल. तसेच संत्रा साठवणुकीसाठी अत्याधुनिक शीतगृहेही येथे उपलब्ध आहेत. याचा फायदाही शेतकऱ्यांना होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या प्रकल्पासाठी राज्य शासनाच्यावतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. याठिकाणी संत्र्यासाठी आवश्यक असणाऱ्या दर्जेदार कलमा तयार करण्याकरिता पतंजली आणि राज्यशासन संयुक्तपणे सर्व सुविधांनी युक्त आधुनिक नर्सरी उभारेल, असेही त्यांनी सांगितले.

## होणाऱ्या बायकोच्या त्रासाला कंटाळून युवकाची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

ज्या तरुणीवर दोन वर्षांपासून जीवापाड प्रेम केले, त्याच तरुणीशी प्रेमविवाह ठरल्याने युवकाचा आनंद गगनात मावत नव्हता. महिन्याभरावर लग्नाचा मुहूर्त होता. घरात लग्नाची तयारी सुरु होती. रात्रीला प्रेयसीसोबत जेवायला जाऊन रात्री उशिरा घरी आला. घरी आल्यानंतर युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना वाडी परिसरात उघडकीस आली. प्रज्योत असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रज्योत हा आईवडिलांना एकुलता मुलगा. त्याचे वडिल ऑटो चालवतात तर आई हातमजुरी करते. उच्चशिक्षित प्रज्योत हा एका भूखंड खरेदी-विक्री करणाऱ्या कंपनीत सल्लागार म्हणून नोकरी करीत होता. त्याचे दोन वर्षांपूर्वी संजना (काल्पनिक नाव) या युवतीशी मैत्री झाली. काही दिवसांतच दोघांची मैत्री वाढली. आणि प्रेमसंबंध निर्माण झाले. उच्चशिक्षित संजना आणि प्रज्योतचे दोन वर्षे प्रेमप्रकरण सुरु होते. प्रज्योतने संजनाला लग्न करण्याचा तगादा लावला. तिने काही दिवस कुटुंबियांसोबत चर्चा करण्यासाठी वेळ मागितला. काही महिने गेल्यानंतर पुन्हा प्रज्योतने तिला लग्नाबाबत विचारणा केली. त्यामुळे तिने आईवडिलांशी चर्चा केली. मात्र, त्यांनी लग्नास विरोध दर्शविला. मात्र, दोघांनी मिळून प्रेमविवाह करण्याचा निर्णय घेतला. दोघांनी गेल्या महिन्यांत विवाह करण्यासाठी नोंदणी केली. येत्या १७ मार्चला दोघांचा प्रेमविवाह ठरला होता. प्रज्योतच्या आईने होणाऱ्या सुनेसाठी मंगळसूत्र, अंगठी आणि लग्नाचे कपडेसुद्धा घेतले होते. घरात लग्नाचे वातावरण आणि खरेदी सुरु होती. त्यामुळे घरात आनंदाचे वातावरण होते.

प्रज्योतचा रविवारला (९ मार्च) वाढदिवस होता. तो शनिवारी सायंकाळी घरी आला. तेवढ्यात संजनाचा फोन आला. त्यामुळे तो प्रेयसीला भेटायला निघून गेला. दोघेही एका हॉटेलमध्ये गेले. दोघांनी केक कापून वाढदिवस साजरा केला. त्यानंतर तो रात्री उशिरा घरी आला. त्याने घरात जाऊन रविवारी पहाटेच्या सुमारास ओढनीने गळफास घेऊन आत्महत्या केली. सकाळी आई झोपेतून उठली आणि त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला त्याच्या खोलीत गेली. मुलगा गळफास घेतलेल्या स्थितीत बघताच तिने हंबरडा फोडला या प्रकरणी वाडी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

## दिल्लीत पहिले ब्राह्मण भवन आणि वसतिगृह

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ (एबीबीएम) आणि ब्रह्मोद्योग फाऊंडेशनने महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा केली आहे. दिल्लीतील पहिल्या ब्राह्मण भवन आणि वसतिगृहाचे समाजार्पण ३० मार्च रोजी गुढीपाडव्याला होणार आहे.

या कार्यक्रमाला गोविंददेवगिरी महाराज आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार आहेत. एबीबीएमचे अध्यक्ष डॉ. गोविंद आर. कुलकर्णी यांनी सांगितले की, पुणे, मुंबई, बंगळुरू, वाराणसी आणि अयोध्या येथेही असे भवन उभारले जाणार आहेत.

या वसतिगृहात सुमारे ५०० विद्यार्थ्यांना अल्प शुल्कात राहण्याची सोय असेल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांमध्ये शिक्षणासाठी येताना होणाऱ्या निवासाच्या समस्येवर हे एक उत्तर ठरणार आहे. एबीबीएमने 'आत्मनिर्भर ब्राह्मण प्रकल्प' देखील सुरू केला आहे. या अंतर्गत पुढील तीन वर्षांत किमान ३००० उद्योजकांना मदत केली जाणार आहे. प्रत्येक उद्योजकाला ५०,००० रुपयांपर्यंत आर्थिक मदत दिली जाईल.

## शिवसृष्टीचा दुसरा टप्पा शिवजयंतीला सुरु

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ९ :

महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने आंबेगाव बुद्रुक येथे साकारत असलेल्या शिवसृष्टीचा दुसरा टप्पा आता पूर्णत्वास आला असून येत्या शिवजयंतीच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या टप्प्याचे लोकार्पण होणार आहे. या वेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार उपस्थित असतील, अशी माहिती महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे मुख्य विश्वस्त जगदीश कदम यांनी गुरुवारी पत्रकारांशी बोलताना दिली. या वेळी प्रतिष्ठानचे विश्वस्त विनीत कुबेर, सुनील मुतालिक, अमृत पुरंदरे व शिवसृष्टीचे व्यवस्थापक अनिल पवार उपस्थित होते.

पद्मविभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या मूळ संकल्पनेतून साकारत असलेल्या या शिवसृष्टी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याची माहिती देताना जगदीश कदम म्हणाले की, या टप्प्यामध्ये प्रामुख्याने एक भव्य स्वागत कक्ष, एखाद्या आधुनिक थीम पार्कला साजेल असे टाइम मशीन थिएटर व तुळजाभवानी मातेचे भव्य मंदिर यांचा समावेश आहे. छत्रपती शिवाजी महाराज एक माणूस म्हणून कसे होते हेदेखील लोकांपर्यंत पोहोचवायला हवे असे बाबासाहेब पुरंदरे यांचे स्वप्न होते. त्यानुसार या टप्प्याची रचना करण्यात आली आहे. या टप्प्याच्या निर्मितीमध्ये सुमारे रुपये ८७ कोटी इतकी गुंतवणूक करण्यात आली असून स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा ही शिवाजी महाराजांना जवळची असणारी महत्त्वाची ३ तत्त्वे यावर या टप्प्याच्या निर्मितीमध्ये विशेष लक्ष केंद्रित करण्यात आल्याचे कदम यांनी सांगितले.

## रस्त्यात अडवून विद्यार्थिनीशी गैरवर्तन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

गृहमंत्र्यांच्या शहरात मुली व महिला सुरक्षित नसल्याची घटना समोर आली. एका युवकाने भरदुपारी रस्त्यावरच विद्यार्थिनीशी लगट करीत लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, नागरिकांनी वेळीच सतर्कता दाखवल्यामुळे मोठा अनर्थ टळला. ही घटना गणेशपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या प्रकरणी पोलिसांनी विद्यार्थिनीच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करुन अटक केली. शोएब रहिम बेग (२७, भालदारपुरा, गणेशपेठ) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पाचपावली पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी १५ वर्षीय मुलगी ही दहावीची विद्यार्थिनी आहे. ती रोज गणेशपेठमधून घराकडे जाते. त्याच रस्त्यावर आरोपी शोएब रहिम बेग हा उभा राहून तिची नेहमी छेड काढत होता. तिचा पाठलाग करुन तिच्यावर शेरेबाजी नेहमी करीत होती. तिने अनेकदा त्याच्या कृत्याकडे दुर्लक्ष केले. सध्या पेपर सुरु असल्यामुळे दुपारी घरी जात होती. महिला दिनी शनिवारी दुपारी ती शाळेतून घरी जात असताना आरोपी शोएब रहिम बेग याने तिचा पाठलाग केला.

भररस्त्यावर तिला अडवले आणि तिला गुलाबाचे फुल देण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थिनीने त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे चिडलेल्या शोएबने तिच्याशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे विद्यार्थिनीने आरडाओरड केला. त्यामुळे नागरिकांनी चौकात धाव घेतली. शोएबला चांगला चोप दिला आणि गणेशपेठ पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळावर पोहचून आरोपीला ताब्यात घेतले. मुलीच्या तक्रारीवरुन शोएबविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्याला अटक करुन उद्या न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

## २०२५ मध्ये पीआयआरआय निर्देशांकात दिल्ली आणि बेंगळुरू जागतिक क्रमवारीत वाढ

नाईट फ्रँकच्या प्रमुख द वेल्थ रिपोर्ट २०२५ ने उघड केले की २०२४ मध्ये प्राइम इंटरनॅशनल रेसिडेन्शियल इंडेक्स (पीआयआरआय १००) चे मूल्य ३.६% ने वाढले आहे. ट्रॅक केलेल्या १०० लक्झरी निवासी बाजारपेठांपैकी ८० सकारात्मक किंवा समान वार्षिक किमतीत वाढ नोंदवली गेली. सोलने १८.४% वार्षिक वाढीसह क्रमवारीत आघाडी घेतली आहे, तर मनिला १७.९% (गेल्या वर्षीच्या आघाडीवर) दुस?या स्थानावर घसरली आहे. दुबई (१६.९%), रियाध (१६%) आणि टोकियो (१२.१%) हे पहिल्या पाच क्रमांकावर आहेत.

वार्षिक विकास दरातील सुधारणा मध्य पूर्व (७.२%), लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन (६.३%) मधील मजबूत प्रादेशिक कामगिरीमुळे झाली आहे. उच्च व्याजदर, मंदावलेली अर्थव्यवस्था आणि काही प्रमुख बाजारपेठांमधील क्रियाकलापांवर ग्राहकांचा विश्वास कमकुवत झाल्याने युरोप २.५% वर मागे पडला. तथापि, विशेषतः प्रमुख दुसऱ्या घरातील बाजारपेठांमध्ये चमकदार ठिकाणे होती. कॅनेडियन प्राइम मार्केट आणि मियामीसारख्या काही अमेरिकन बाजारपेठांमध्ये कमकुवत वाढीमुळे उत्तर अमेरिकन वाढ (२.४%) मागे पडली, जी अलिकडच्या मजबूत वाढीनंतर मंदावली.



लोकार्थ

३.७% च्या सरासरी वाढीसह, सनबेल्ट मार्केटने शहरी बाजारपेठांमध्ये (३.५%) आणि स्की डेस्टिनेशन्स (२.६%) आघाडी घेतली. रिसॉर्ट बाजारपेठांनी या वर्षीही त्यांची चांगली कामगिरी सुरू ठेवली, महामारीनंतरच्या काळातही मूल्यांमध्ये जवळपास ३०% वाढ झाली, तर स्की डेस्टिनेशनमध्ये २५% वाढ झाली, तर शहरे फक्त १९% वाढीसह मागे राहिली.भारतीय शहरांमध्ये, दिल्ली १८ व्या क्रमांकावर आहे, लक्झरी निवासी किमतींमध्ये वर्षानुवर्षे (वार्षिक) ६.७% वाढीमुळे ही लक्षणीय वाढ झाली आहे. त्यानंतर मुंबई २१ व्या क्रमांकावर आहे, तर बेंगळुरू ४० व्या क्रमांकावर आहे. बेंगळुरू आणि दिल्ली दोघेही वार्षिक क्रमवारीत वर गेले. ■ ■

## बँक ऑफ महाराष्ट्र आणि कस्टमर कॅपिटलतर्फे ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मसह लॉयल्टी सादर

कॅप्टिव्ह कॉमर्स लॉयल्टी सोल्यूशन्समध्ये विशेषज्ञता असलेली कंपनी कस्टमर कॅपिटल आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांनी बँक ऑफ महाराष्ट्र कार्डधारकांसाठी एक विशेष ट्रॅव्हल प्लॅटफॉर्म आणि लॉयल्टी रिवॉर्ड्स सादर करण्यासाठी भागीदारीची घोषणा केली. कस्टमर कॅपिटल आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यातील या सहकार्याचा उद्देश बँक ऑफ महाराष्ट्र कार्ड वेबसाइट आणि ॲपद्वारे थेट एक अखंड आणि फायदेशीर प्रवास बुकिंग अनुभव प्रदान करून बँक ऑफ महाराष्ट्र कार्डधारकांसाठी मूल्य प्रस्ताव वाढवणे आहे.

कस्टमर कॅपिटलने 'ट्रिपस्टॅक' नावाचा एक व्हाइट-लेबल ट्रॅव्हल प्लॅटफॉर्म तयार केला आहे जो बँकांना त्यांच्या ग्राहकांसाठी अनुभव सानुकूलित करण्यास आणि पारंपारिक रणनीतिक प्रचारात्मक भागीदारीद्वारे उपलब्ध नसलेल्या प्रवास आणि खर्च (T&E) वरील खर्च (T&E) बद्दल अंतर्दृष्टी मिळविण्यास अनुमती देतो. ही सेवा बँक ऑफ महाराष्ट्र कार्डधारकांना बँक ऑफ महाराष्ट्र कार्ड वेबसाइट आणि ॲपद्वारे प्रवेशयोग्य असलेल्या विश्वसनीय ट्रॅव्हल पोर्टलद्वारे हॉटेल आणि तिकिटे बुक करण्यास सक्षम करेल. ■ ■ ■

## डेव्हसलपर्स अँड ब्लॅकस्टोनद्वारा 6200 कोटींच्या आयपीओसाठी दस्तावेज सादर

सत्व डेव्हलपर्स अँड ब्लॅकस्टोन द्वारा प्रायोजित, देशात अत्युच्च दर्जाच्या पोर्टफोलिओची मालकी व व्यकवस्थापन करणाऱ्या नॉलेज रियाल्टी ट्रस्ट आरईआयटी संस्थेद्वारा, आयपीओच्या माध्यमातून युनिट विक्री करुन रु. 6200/- कोटी रुपये भांडवल उभारण्याच्या हेतुने नियामक संस्थेकडे दस्तावेज सादर करण्यात आले आहेत. प्रस्तुत आयपीओ सत्व डेव्हहलपर्स प्रायव्हेसट लिमिटेड आणि बीआरईपी एशिया एसजी एल अँड टी होल्डिंग (एनक्यू) पीटीई लिमिटेड ॲक्सिस ट्रस्ट सरव्हीसेस लिमिटेड ट्रस्टी आहे. तसेच नॉलेज रियाल्टी ऑफीस मॅनेजमेंट सवीर्सेस प्रायव्हेटि लिमिटेड (पूर्वाश्रमीची ट्रीनीटी ऑफिस मॅनेजमेंट सर्व्ही सेस प्रायव्हेजट लिमिटेड ही इश्यू मॅनेजर आहे. सदर आयपीओ इश्यू बुक बिल्डिंग प्रक्रियेद्वारा करण्यात येणार असून इश्यूपैकी 75 टक्क्यांपेक्षा अधिक युनिट बिगर सस्थात्मक गुंतपणूकदारांसाठी गुणोत्तर प्रमाणात उपलब्ध ठेवण्यात येतील. यात स्ट्रॅटेजिक गुंतवणुकदारांचा गुणोत्तर प्रमाणातील राखीव युनिटचा समावेश नाही. तसेच त्यांच्यासाठी 25 टक्क्यांपेक्षा कमी युनिट उपलब्ध ठेवण्यात येणार अअसून त्यात स्ट्रॅटेजिक गुंतवणूकदारांच्या वाट्याचा समावेश नाही. आयपीओतून मिळणाऱ्या एकूण भांडवलापैकी रु. 5800/- कोटी ॲसेट एसपीव्हीर वरील संस्थात्मक कर्ज व गुंतवणूकदारांवरील कर्ज फेडण्यासाठी वापरण्यात येणार आहे. ■ ■

## सनफिस्ट कुरकुरीत लेअर्स आणि चविष्ट चीजसह ग्राहकांना देणार 'वॉव' फील




बिस्किटांच्या श्रेणीत वेगळ्या प्रकारच्या चवींचा अनुभव ग्राहकांना देणाऱ्या आयटीसीच्या सनफिस्ट ने आपले नवीन उत्पादन - सनफिस्ट वॉवझर्स लॉन्च केलं आहे. अतुलनीय क्रंच आणि आनंददायक फ्लेवर्सचा अद्वितीय मिश्रण असलेल्या सनफिस्ट वॉवझर्स ने क्रॅकर श्रेणीला पुन्हा परिभाषित करण्याचा उद्देश ठेवला आहे, आणि चवीच्या क्रॅकर श्रेणीला एक गोड, इंडलजेंट ट्विस्ट देऊन स्नॅक टाईम चे रूप बदलणार आहे.

क्रंचीनेस म्हणजेच कुरकुरीतपणा हे क्रॅकरमध्ये ग्राहकांच्या पसंतीला महत्व देणारा एक मुख्य घटक ठरला आहे, आणि सनफिस्ट वॉवझर्स मध्ये असलेल्या 14 -लेयर क्रॅकर डिझाईनमध्ये अपूर्व कुरकुरीपण आणि समृद्ध टेक्सचर आहे. पारंपरिक फ्लेवर्सपासून वेगळे राहून, सनफिस्ट वॉवझर्स दोन आनंददायक प्रकार सादर करतो. चीज क्रीम असलेला क्रॅकर आणि लिंबू क्रीम असलेला क्रॅकर. ही विशेष चव, गोडीचा थोडासा स्प्रिंकल खूपच टेक्सचरल अनुभव देतो. लॉंचसोबत, ब्रॅंडने एक रोमांचक नवीन जाहिरात मोहीम सुद्धा सुरू केली आहे, जी या गेम-चेंजिंग स्नॅकच्या अस्सलतेला दर्शवते. ओजिलवी ने तयार केलेली ही टीव्हीसी, ज्यात इसके हर बाइट में है वॉव! हा टॅगलाइन आहे. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## माधव राष्ट्रीय उद्यान आता व्याघ्रप्रकल्प

### मध्यप्रदेश सरकारकडून अधिसूचना

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

देशातील व्याघ्र प्रकल्पाच्या संख्येत आता ५८व्या व्याघ्रप्रकल्पाची भर पडली आहे. मध्यप्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातील माधव राष्ट्रीय उद्यानाला व्याघ्रप्रकल्प म्हणून घोषित करण्यास केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने मान्यता दिली आहे. मध्यप्रदेशातील हा नववा व्याघ्रप्रकल्प असून गेल्या तीन महिन्यात सलग दुसरा व्याघ्रप्रकल्प या राज्याला मिळाला आहे. मध्यप्रदेश सरकारने याबाबत अधिसूचना प्रसिद्ध केली आहे

१९५६ मध्ये स्थापन झालेल्या माधव राष्ट्रीय उद्यानाला व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा मिळाला आहे. मध्यप्रदेशातील हा नववा व्याघ्र प्रकल्प आहे. दोन वर्षांपूर्वी माधव राष्ट्रीय उद्यानात दोन मादी आणि एक नर वाघ सोडण्यात आला होता. मादी वाघिणीने दोन बछड्यांना जन्म दिला.

आता आणखी दोन वाघिणी या व्याघ्रप्रकल्पात सोडल्या जातील. यामुळे वाघांची संख्या सात होईल आणि नैसर्गिक प्रजननातून वाघांची संख्या वाढेल, असा विश्वास मध्यप्रदेश सरकारला आहे.

कुनो राष्ट्रीय उद्यानात चित्ता आणि माधव राष्ट्रीय उद्यानात वाघ असल्याने पर्यटकांना दोन मोठे वन्यप्राणी पाहण्याची संधी मिळेल. वाघासोबतच, बिबट्या, लांडगा, कोल्हा, साळू, अजगर, चिंकारा इत्यादी वन्यप्राणी देखील माधव राष्ट्रीय उद्यानात आढळतात.

याबाबत माहिती देताना मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव म्हणाले, राज्यातील दुसऱ्या व्याघ्र प्रकल्पाचे तीन महिन्यांत उद्घाटन होणे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. रतापाणी व्याघ्रप्रकल्प हा डॉ. विष्णू श्रीधर वाकणकर यांच्या नावावर असलेला आठवा व्याघ्र प्रकल्प होता. डिसेंबर २०२४ मध्ये या व्याघ्रप्रकल्पाची घोषणा झाली होती.

## तडीपार गुंडास अटक

**नागपूर :** बजाजनगर पोलिसांनी शुक्रवारी रात्री एका तडीपार गुंडाला विना परवानगी परिसरात फिरताना अटक केली. दुर्योधन उर्फ रोहन मनोहर वर्मा (२३) रा. लक्ष्मीनगर झोपडपट्टी असे आरोपीचे नाव आहे. रोहन हा सराईत गुन्हेगार आहे. गतवर्षी नोव्हेंबर महिन्यात परिमंडळ क्रमांक एकचे पोलिस उपायुक्तांनी त्याला दोन वर्षांसाठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार केले होते. बजाजनगर पोलिसांचे पथक गस्त घालत होते. या दरम्यान रोहन सावरकरनगर चौकात फिरत असल्याची माहिती पथकाला मिळाली. विना परवानगी शहरात दखल झाल्यामुळे त्याच्याविरुद्ध कलम १४२ अन्वय गुन्हा नोंदविण्यात आला.

## महाबोधी महाविहार कायदा १९४९ रद्द करा : प्रकाश आंबेडकर

# वंचित बहुजन आघाडीचे बुधवारी राज्यव्यापी आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण बौद्ध समाजाकडे देण्यात यावे, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीने आवाज उठवला आहे. बौद्ध धम्माच्या पवित्र जागेवर अद्यापही बौद्ध समाजाचे संपूर्ण नियंत्रण नसणे, हा अन्याय आहे. महाबोधी महाविहार कायदा, १९४९ रद्द करण्यात यावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.



या पार्श्वभूमीवर, महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी, तसेच महाबोधी महाविहार कायदा १९४९ रद्द करण्याच्या मागणीसाठी बुधवारी (दि.१२) राज्यव्यापी आंदोलनाचे आयोजन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात येणार असल्याचेही ॲड. आंबेडकरांनी सांगितले.वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी या कायद्याविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत, बौद्ध समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. या आंदोलनात बौद्ध समाज आणि सर्व न्यायप्रिय नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीने केले आहे.

दरम्यान, बिहारमधील बोधगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती चळवळ सध्या बौद्ध समाजाच्या महत्त्वपूर्ण मागण्यांसाठी संघर्ष करत आहे. या चळवळीला देशभरातील तसेच परदेशातील बौद्ध समाजाचा मोठा पाठिंबा मिळत आहे. तसेच महाबोधी मंदिर मुक्ती ही केवळ धार्मिक बाब नसून, ती भारताच्या राजनैतिक, सांस्कृतिक आणि परराष्ट्र संबंधांशी संबंधित महत्त्वाची चळवळ असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले होते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार या प्रचंड चळवळीच्या मागण्यांकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप प्रकाश आंबेडकरांनी केला होता. महाबोधी मुक्ती चळवळीबाबत मोदी सरकारचे मौन भारतविरोधी असल्याचेही ते म्हणाले होते.